# चीनदेशाची संक्षिप्त माहिती.

धनंजय प्रेस—खानापूर, बेळगांव.

लोकमित्र मासिकांत प्रसिद्ध झालेली

# चीनदेशाची संक्षिप्त माहिती.

लेखक

## वासुदेव दामोदर मुंडले.

मुद्रक व प्रकाशक

## दत्तात्रय गोविंद सडेकर


मुद्रणाचें व प्रकाशनाचें स्थल **धनंजय** प्रेस

खानापुर ( बेळगांव. )

शके १८३६. ] [ सन १९१४

**किंमत ०४ आणे.**

पुस्तकासंबंधीं सर्व प्रकारचे हक्क प्रकाशकांनीं
आपल्या स्वाधीन ठेविले आहेत.

# प्रस्तावना.

प्रस्तुत शतकाच्या प्रारंभीं जपाननें प्रबल युरोपियन राष्ट्राचा (रशियाचा) पाडाव करून जो दिग्विजय संपादन केला, त्याचा आशिया खंडांतील शिथिल झालेल्या राष्ट्रांवर पुष्कळसा इष्ट परिणाम घडून त्या राष्ट्रांमध्यें एक प्रकारची नवी उमेद व नवी जागृति उत्पन्न झाली. 'पाश्चात्य राष्ट्रांच्या वैभवापुढें व सामर्थ्यापुढें आपलें कांहीं चालणार नाहीं' अशी जी ह्या राष्ट्रांची समजूत होती ती जपानच्या उपरोक्त विजयानें पार लयास गेली व प्रयत्न केल्यास आपणही जगांतील राष्ट्रमालिकेंत योग्य पदवी प्राप्त करून घेऊं अशी भावना त्यांचे ठायीं उदित झाली. ह्या भावनेनें प्रेरित होऊन गेल्या ७।८ वर्षांत ज्या ज्या राष्ट्रांनीं आपले हातपाय हालविण्यास सुरवात केली, त्यांतच चिनी राष्ट्राचा समावेष होतो.

रुसो-जपानी युद्ध संपेपर्यंत चिनी लोकांवर मँचू नावाच्या परकीय राजघराण्याची राजसत्ता चालत होती. परंतु त्या युद्धानंतर चीन देश जेव्हां खडबडून जागा झाला, तेव्हां त्यानें स्वदेशांतील समाजांत अनेक सुधारणा करण्याचा उपक्रम सुरू करून अखेरीस थोड्या दिवसांपूर्वीं लोकांनां इष्ट अशी राजक्रांति घडवून आणली. ह्या क्रांतीची चळवळ तेथें सुरू झाल्यापासून जगांतील सर्व लोकांचें लक्ष्य ह्या 'झोंपी गेलेल्या' राष्ट्राकडे वेधलें व ते मोठ्या उत्सुकतेनें त्या राष्ट्रासंबंधीं माहिती मिळवूं लागले.

चिनी लोकांसंबंधीं माहिती करून घेण्याच्या जिज्ञासेची जी लाट वर सांगितल्याप्रमाणें सर्व जगभर उसळली तिच्या कक्षेंतून हिंदुस्थान अलिप्त राहणें अशक्य होतें. अर्थात् इकडील कांहीं विचारी लोकांनां साहजिकच त्या जिज्ञासेनें घेरलें; आणि प्रस्तुत छोटेखानी पुस्तक हें त्या जिज्ञासेचेंच फळ आहे. मराठी भाषेंत चीन देशासंबंधीं–पूर्वापारपासून तों हा कालपर्यंतची–इतकी उपयुक्त माहिती आजपर्यंत संकलित रुपानें कोणी प्रसिद्ध केलेली नसल्यामुळें प्रस्तुत लेखमाला स्वतंत्र पुस्तकाच्या रुपानें मुद्दाम प्रसिद्ध करण्यांत येत आहे. त्याचा मराठी वाचकांस योग्य तो उपयोग करून घेण्याची बुद्धि होवो, इतकें सुचवून ही अल्पशी प्रस्तावना पुरी करितों.


इसलामपुर.
श्रावण शु. १५ शके १८३५

वासुदेव दामोदर मुंडले.

# विषयानुक्रमणिका.

पृष्ठ.

ास्थितीचें व लोकस्थितीचें सामान्य वर्णन. ... १
नी लोकांच्या धर्मविषयक कल्पना. ... ... ... ८
यांची स्थिति. ... ... ... ... ... ... १०
क्षण, वाङ्मय व तत्वज्ञान. ... ... ... ... १३
यदा व राज्यव्यवस्था. ... ... ... ... ... १९
यदा व राज्यवस्था. ... ... ... ... ... २१
ळ व करमणुकीचे प्रकार. ... ... ... ... ३६
शिष्ट स्वभाव, मनोवृत्ति व चालीरीति. ... ... ४३
ासंहार. ... ... ... ... ... ... ... ५०



# चीन देशासंबंधीं संक्षिप्त माहिती.

## लेखांक १ ला.

## देशस्थितीचें व लोकस्थितीचें सामान्य वर्णन.

युरोपियन लोकांच्या दृष्टीनें कुंभकर्णाप्रमाणें कित्येक शतकें घोरत पडलेल्या **चीन** देशानें नुकतेंच आपलें अंग झाडून सर्व जगास थक्क करून टाकण्यासारखें शतकृत्य करून दाखविलें आहे. **चीन** देशांतील नवीन जागृतीस सुमारें १०।१२ वर्षांपूर्वीच सुरवात झालेली आहे. परंतु, त्या जागृतीचें पर्यवसान तेथें ' लोकसत्ताक राज्य ' स्थापनेंत होईल असें मात्र ती गोष्ट प्रत्यक्ष घडून येईपर्यंत कोणास वाटलें नाहीं. ' **चीन** व लोकसत्ताक राज्य ' ह्या दोन गोष्टी अगदीं असंबद्ध—परस्पर विरुद्ध—आहेत असेंच बहुतेक राजकारणी लोकांस वाटत असे. व आज जरी प्रत्यक्ष ती गोष्ट घडून आलेली आहे तरी ती कितपत यशस्वी होईल—किती काल कायम टिकेल—याबद्दल अद्यापही कित्येकांना शंका वाटत आहे. चीनी ' लोकसत्ताक राज्य ' मान्य करण्यास युरोपियन राष्ट्रांनीं जी दिरंगाई केली त्याचें कारण वरील संशयात्मक भावनेंतच आहे. अमेरिकन राष्ट्रानें जर दिलदारपणानें हें ' लोकसत्ताक राज्य ' मान्य केलें नसतें तर युरोपियन राष्ट्रांनीं त्यास इतक्या लवकर आपली मान्यता दर्शविली असती किंवा नाहीं, याची शंकाच आहे. ' लोकसत्ताक राज्याची स्थापना ' होते न होते तोंच **चीन**मध्यें एक भयंकर बंड झालें. व ह्या बंडांत ह्या नवीन लोकसत्ताक राज्याची ' इतिश्री ' होते कीं काय, अशी साधार भीति कित्येक विचारी पुरुषांस वाटण्याजोगा समय प्राप्त झाला होता. परंतु चिनी लोकांनीं व त्यांच्या पुढाऱ्यांनीं ह्या वेळीं विलक्षण सावधानता, आत्मसंयमन व संघटनासामर्थ्य इत्यादि गुणांच्या साह्यानें ह्या बंडाचा उपशम केला व आपल्या मित्रांस आणि शत्रूंस सारखेंच थक्क करून सोडलें. हें बंड मोडल्यानंतर लवकरच तेथील प्रजासत्ताक राज्याचीं सूत्रें चालविणाऱ्या अध्यक्षाची नवीन निवडणूक झाली. त्यानंतर आतां तेथील राज्यकारभार इतर प्रमुख राष्ट्रांतील राज्यकारभाराप्रमाणें सुरळीत चालला आहे. हें सर्व ठीक आहे; परंतु ७।८ वर्षांपूर्वीं जे चिनी लोक युरोपियनांच्या दृष्टीनें गबाळ व लोकसत्ताक राज्यपद्धतीस नालायक ठरले होते, त्यांनीं अल्प कालांत यक्षिणीची कांडी फिरल्याप्रमाणें असा दिव्य चमत्कार कसा करून दाखविला, ह्या

प्रश्न प्रत्येक सुशिक्षित माणसाच्या मनांत उभा रहातोच. आणि या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर मिळविणें असेल तर, चिनी लोकांची पूर्वपीठिका व त्यांचें राष्ट्रीय शील अथवा स्वभाव यांची थोडीशी तरी माहिती करून घेणें जरूर आहे. ज्यांनां ह्या गोष्टींची माहिती होईल त्यांनां **चीन**मध्यें घडून आलेल्या प्रस्तुत राज्यक्रांतीचें फारसें आश्चर्यही वाटणार नाहीं व त्यांत कांहीं अनभ्यस्त असा प्रकार घडला आहे, असेंही त्यांस वाटणार नाहीं. जें कांहीं घडून आलें आहे तें सर्व त्या लोकांच्या परंपरेस–शीलास अनुसरूनच असून तें क्रांतीपेक्षां उत्क्रांतीच्याच मार्गानें घडून आलेलें आहे अशी त्यांची विचारांतीं पूर्ण खात्री होईल. व त्यांचें मन विस्मयाच्या वातावरणांतून निघून विचाराच्या–कार्यकारणपरंपरा जाणण्याच्या–वातावरणांत विहार करूं लागेल. हें समाधान ह्या प्रांतांतील केवळ मराठी वाचकांस प्राप्त करून द्यावें अशा हेतूनें प्रस्तुत लेखमाला लिहिण्याचें योजिलें आहे.*

---

* वरील मजकूर लिहून बरेच दिवस झाल्यानंतर चीनमध्यें आणखी एक नवीन स्थित्यंतर झालें आहे. तें असें कीं, तेथील अध्यक्ष **युयानशिकाई** यानें लोकनियुक्त राजसभा बंद ठेवून तूर्त ७५ लोकप्रतिनिधींचें एक सल्लागारमंडळ नेमलें आहे. परंतु त्याच्या ह्या कृत्यासंबंधानें निरनिराळ्या ठिकाणीं जी माहिती प्रसिद्ध झाली तिचा व खुद्द **युयानशिकाई** याच्या राजकीय धोरणाचा विचार करितां, त्यानें केलेली ही योजना चिनी लोकसत्ताक राज्याच्या इमारतीस बळकटी आणण्याकरितांच केलेली आहे, असें स्पष्ट कळून येण्यासारखें आहे. निदान प्रस्तुत लेखकाचें तरी तसें मत आहे. परकीय राष्ट्रें चीनचे लचके तोडण्यास टपलेलीं, त्यांतच अंतस्थ शत्रूंनीं भंडावून सोडलेलें पाहून, कांहीं कालपर्यंत देशाचे भावी कल्याणाकरितां राजसत्तेच्या अधिकाराचें केंद्रीकरण करण्याचा जरी **युयानशिकाई** यानें प्रयत्न केला, तरी त्यामुळें चिनी राष्ट्राची पिछेहट होईल अगर तेथें पुन्हा एकतंत्री राज्यपद्धति स्थापन होईल, असें मानणें ह्मणजे **युयानशिकाई**च्या सद्हेतूचा विपर्यास करणें होय. ज्या पुरुषानें इतक्या भयंकर अडचणींतून स्वदेशाचें रक्षण करून त्यांत शांतता राखिली व ज्याचीं राजकीय मतें लोकसत्तावादी आहेत, त्याच्या हातून चीनमध्यें महत्प्रयासानें स्थापन झालेल्या लोकसत्ताक राज्याची इतिश्री कधींही होणार नाहीं, हें युरोपियन लेखकांचे कावे जाणणाऱ्या लोकांस सांगावयास पाहिजे असें नाहीं.

ह्या लेखमालेंत प्राचीनकाळापासून तों प्रस्तुतची क्रांती होईपर्यंत चिनी समाजांत कोणकोणतीं स्थित्यंतरें झालीं व त्यांमध्यें वेळोवेळीं चिनी लोकांच्या अंगच्या कोणकोणत्या गुणांचें प्रदर्शन झालें हें संक्षिप्तरीतीनें सांगण्याचा आमचा विचार आहे. प्रस्तुत लेखांत चिनांतील देशस्थितीचें व लोकस्थितीचें सामान्य वर्णन देण्यांत येत आहे.

१ इतिहास अगर भूगोल यांमध्यें **चीन** देशासंबंधीं जे उल्लेख केलेले असतात त्यांत ' चीनचें साम्राज्य ' हा शब्दसमुच्चय **चीन** देशास अनुलक्षून लाविलेला असतो. ह्या शब्दसमुच्चयामध्यें मंगोलिया, मांचुरिया, पूर्व तुर्कस्थान, तिबेट व चीनचे १८ परगणे इतक्या प्रदेशाचा समावेष होतो. व एके काळीं हा सर्व प्रदेश **चिनी** राष्ट्राच्या आधिसत्तेखालीं होताही. ( ह्यांतील कांहीं प्रदेश अद्यापही त्या आधिसत्तेखालीं आहे. ) परंतु खुद्द चिनी लोकांचें ' वसतिस्थान ' व ' जन्मभूमी ' अथवा ' मातृभूमी ' असें ज्यास ह्मणतां येईल तो प्रदेश ' चीनचे १८ परगणे ' हाच होय. हा भूप्रदेश विस्तारानें १५०,००० चौरस मैल आहे. उत्तरेस **पेकिंग** शहर ( राजधानी ), दक्षिणेस कँटन शहर ( व्यापाराचें मुख्य मध्यवर्ती ठाणें ), पूर्वेस शांघाय शहर व पश्चिमेस तिबेटची सरहद्द याप्रमाणें स्थूलमानानें ह्या प्रदेशाच्या मर्यादा आहेत. त्यांत **उत्तर** व **दक्षिण** विभाग असे दोन मोठे भाग आहेत. उत्तर भागांतलि हवापाणी समशीतोष्ण असें आहे. त्यांतल्या त्यांत पेकिंग शहरची हवा फार सुंदर आहे. ह्या भागांत मोठमोठीं मैदानें असून त्यांवर मधून मधून गांव वसलेले आहेत. ह्या गावांतील घरें मातीचीं आहेत. दक्षिण भागांत डोंगरांच्या अनेक रांगा असून त्यांतील सृष्टिसौंदर्य अवर्णनीय आहे. ह्या रांगांतील उंच टेंकड्यांवर जागोजाग मोठमोठे मठ बांधलेले आहेत. उन्हाळ्यांत येथें सुखवस्तु लोक नित्य हवा खाण्याकरितां येऊन रहात असतात. ह्या भागांतील हवा फार उष्ण आहे व त्यामुळें उन्हाळ्यांत टेकड्यांवरील ह्या मठांचा आश्रय करणें पुष्कळांस जरूरीचें व सोईचें वाटतें हे मठ पुष्कळ आहेत. **कँटन** शहरानजीकच्या एका टेंकडीवरच सुमारें १०० च्या वर असले मठ आहेत व तेथें पुष्कळ लोकांनां भाड्यानें जागा घेऊन राहण्याची सोय मठाधिपतींनीं केलेली आहे.

किनाऱ्यावर राहणारे लोक उत्तर भागांतील व मध्यवस्तींतील लोकांपेक्षां अधिक हुषार व चपळ आहेत. ' डोंगरापाशीं सद्गुण व पाण्यानजीक शहाणपण

अशी एक चिनी ह्मण आहे. त्यावरून कोठल्या भागांतील लोकांच्या अंगीं कोणते गुण विशिष्ट असतात हें ध्वन्यर्थानें समजून येण्यासारखें आहे.

उत्तर व दक्षिण ह्या दोन भागांतल्या लोकांमध्यें वारंवार कलह होत असतो. ते पुष्कळअंशी परस्परांविषयीं उदासीन असल्याचेंही दिसून येतें. तथापि महत्वाची राष्ट्रीय हानि न होऊं देण्याबद्दल दोन्ही भागांतील लोक सारखेच सावध व दक्ष असतात.

**चीन**ची लोकसंख्या इ० स० १८४२ त ४० कोटींच्यावर होती असें एका परदेशी प्रवाशाच्या हकीगतीवरून दिसतें **चीन** देशांत खानेसुमारी करण्याची पद्धत प्राचीन काळापासून अस्तित्वांत आहे. इ० स० पूर्वी १५६ व्या वर्षी **चीन**ची लोकसंख्या त्या वर्षांच्या खानेसुमारींत सुमारें ५० कोट आढळून आल्याचा दाखला सापडतो. त्यावरून खानेसुमारीचें शास्त्र **चीन** देशानें उसनें घेतलेलें नाही, ही गोष्ट निर्विवाद ठरतें. त्या देशांत १९०२ सालीं जी खानेसुमारी झाली त्यांत ४० कोटी लोकसंख्या असल्याचें निदर्शनास आलें आहे.

चिनी लोकांची ( १८ परगण्यांतील ) भाषा सकृत्दर्शनीं एकाच तऱ्हेची दिसते. परंतु प्रांतिक भेदाभेदामुळें बोलण्याच्या प्रचारांतील भाषेचे कमींत कमी ८ भेद असलेले दिसून येतात. ह्या आठांपैकीं प्रत्येक भेद उच्चार, रुढी, शब्दयोजना इत्यादि बाबतींत परस्परांहून भिन्न असा आहे. उदाहरणार्थ, शांघायच्या मनुष्याची भाषा कँटनच्या मनुष्याच्या भाषेहून भिन्न असल्यामुळें परस्परांचें बोलणें परस्परांस ( त्या त्या भाषेतील ) स्पष्ट कळणें दुरापास्त होतें. **मँडरिन** नावाचा जो एक चिनी भाषेचा प्रकार आहे तो राजदरबारीं चालू असल्यामुळें लोकव्यवहारांतही त्याचेंच विशेष प्राबल्य आहे. अर्थात्, सर्व मोठमोठे व्यापारी, अधिकारी व बडे लोक हे त्याप्रकाराचें ज्ञान करून घेतात. आणि त्यामुळें व्यवहारांत त्यांचें कोठेंही अडत नाहीं. बोलण्याच्या भाषेंत जरी वरीलप्रमाणें ८ मुख्य भेद आहेत तरी लिहिण्याची भाषा सर्वांची सारखीच—एकच—आहे. निरनिराळ्या आकृतींच्या साह्यानें चिनी अक्षरें बनलेलीं आहेत, हें सर्वत्र प्रसिद्धच आहे. सुमारें तीन हजार वर्षांपासून अशा प्रकारची लेखनपद्धति **चीन**मध्यें चालू आहे. *

* ह्या पद्धतींत नुकतीच सुधारणा करण्यांत येऊन अक्षरांची संख्याही पूर्वीपेक्षां कमी करण्यांत आली आहे.

भाषाभेदाप्रमाणें १८ परगण्यांतील निरनिराळ्या भागांत लोकांच्या चालीरीति, शिष्टाचार, यांतही अनेक प्रकारचें भिन्नत्व आहे. हें भिन्नत्व महत्वाच्या बाबतींत नसून किरकोळ बाबतींतच आहे. उदाहरणार्थ, लग्नाचीच चाल घ्या. ह्या बाबतींत दागिने घेण्यासंबंधीं जे सोहाळे व शिष्टाचार आहेत ते प्रत्येक परगण्यांत निरनिराळ्या प्रकारचे आहेत; परंतु लग्नाची नोंद करण्याची पद्धत सर्वत्र सारखीच प्रचारांत आहे. तसेंच लग्नामध्यें नवरानवरीनें गुडघे टेंकून परमेश्वरास साक्षीस बोलावून तांबड्या दोऱ्यानें एकत्र केलेल्या दोन पेल्यांतील मद्याच्या संस्कारानें वैवाहिक शपथ घेण्याचा जो मुख्य विधि आहे तोही सर्वत्र सारखाच प्रचारांत आहे. तांबडा रंग हा **चीन** देशांत आनंदाचा द्योतक मानला जातो व त्या कारणानें चिनी नोटपेपर तांबड्या रंगानें आंखलेला व त्यावर तांबडें चित्र असलेला आढळून येतो. पांढरा रंग हा तिकडे अमंगल मानला आहे.

**चीनी** परगण्यांत मोठमोठ्या नद्या आहेत व त्यांतून लहान बोटींच्या ( होड्या नावांच्या ) द्वारें प्रवास केला जातो. हे जलप्रवासाचे मार्ग एकमेकांस जोडण्याकरितां लहान लहान कालवे बांधलेले आहेत. एक कालवा अतिशय मोठा आहे. हा कालवा दक्षिणेंतून **पेकींग** शहरास तांदूळ वाहून नेण्याकरितां तयार केलेला आहे. तो १३ व्या शतकांतील **कुबलाइखान** नामक बादशहानें बांधला असून त्याची लांबी सुमारें ६५० मैल आहे. ह्या कालव्यामुळें **पेकींग**पासून **कँटन** शहरापर्यंत एकसारखा जलप्रवास करण्याची सोय झालेली आहे. ह्या कालव्याचें बांधकाम फार भक्कम असून कुशलतेच्या दृष्टीनेंही तें आधुनिक एंजिनिअरींग कामापेक्षां सरस असल्याचें तज्ञ मंडळानेंच कबूल केलें आहे.

**चिनां**तील प्रख्यात तट–भींत–तर सर्वत्रांस माहित आहेच. युरोपियन स्थापत्य ( आर्किटेक्चर ) कलेचा जेव्हां मागमूसही नव्हता तेव्हां हें भव्य तटाचें काम तयार करण्यांत आलेलें आहे. ही भिंत ऊर्फ तट १८०० मैल लांब, २२ फूट उंच व २० फूट रुंद असून ती **पेकींग**च्या पूर्व टोंकापासून तिबेटच्या उत्तर सरहद्दीवर पसरलेली आहे. त्यांत १०० यार्डांच्या अंतरानें ४० फूट उंचीचे बुरूज आहेत. ही भिंत मुळांत विटांची ( पक्क्या ) बांधलेली असावी असें आढळून आलें आहे. ह्याशिवाय आणखीही कित्येक लहान

लहान तट सध्यां पडलेले दिसत आहेत. हे सर्व तट परशत्रूपासून संरक्षण करण्याकरितां बांधले होते.

**चिनी** साम्राज्याच्या कोणत्याही भागांत तेथील लोकांस आपल्या इच्छेनुरूप प्रवास करण्याची मुभा आहे. एका प्रांतांतून दुसऱ्या प्रांतांत जाण्यास परवाना वगैरे कांहीएक लागत नाहीं. परंतु **चिनी** लोक प्रवासाचे फारसे भोक्ते नाहींत. त्यांनां आपलें घरदार सोडून बाहेर जाववत नाहीं. शिवाय प्रवासाचीं साधनेंही असावीं तितकीं सुलभ नसल्यामुळें प्रवास करणें फार गैरसोईचें व दगदगीचें होतें, हेंही प्रवासाविषयीं तेथील लोकांत औदासिन्य असण्याचें कारण आहे. रस्त्यांत चोरांची वगैरे भीति फार असते. तथापि अशा स्थितींतही कांहीं ठळक ठळक लोक सृष्टिसौंदर्याचीं व ऐतिहासिक महत्वाचीं स्थानें पहाण्याकरितां वारंवार प्रवास करितात. **चिनी** अधिकारी तर आपापल्या प्रांतांतून नित्य प्रवास करीत असतात.

**चिनी** संस्कृती ख्रिस्ती शकापूर्वी १० शतकांची जुनी आहे. त्यापूर्वीच चीनमध्यें **सुवर्णयुग** ( Golden Age ) होऊन गेलें अशी दंतकथा आहे. त्या वेळीं **चीन**मध्यें लहान, लहान संस्थानें असून त्यांचे लष्करी अधिपति हेच तेथील राजे होते. ह्या सर्वांत जें एक वरिष्ठ संस्थान होतें त्याच्या अधिपतीस राजा ही संज्ञा प्राप्त होऊन त्याच्या घराण्यास ‘ राजघराणें ’ ही संज्ञा प्राप्त झाली. ह्या संस्थानांमध्यें वारंवार आपसांत भांडणें व युद्धें होत असत व त्या वेळीं युद्धनीति, राजनीति, सामाजिक नीति वगैरे सर्व प्रकार तेथें अस्तित्वांत होते. रोगनिवारणकलाही त्या वेळीं अस्तित्वांत होती. त्या वेळच्या लोकांचीं घरें मातीचीं व वर गवत घातलेलीं अशीं होतीं. घरांतील जमिनीवर गालिच्यांऐवजीं गवत हांतरलेलें असे. त्यानंतर चटया व मग पुढें लवकरच खुर्च्या, टेबलें वगैरे पदार्थ अस्तित्वांत आले. त्यांचे पोषाखही चांगले—रेशमाचे—असत. शिकार करणें, मासे मारणें, शेतकी वगैरे धंदे त्यांच्यांत उत्कर्ष पावले होते. लिहिण्या वाचण्याची कलाही ह्या लोकांस माहित होती. लांकूड अथवा वेळू यांच्या तुकड्यांवर तत्कालीन पुस्तकें लिहिलीं जात असत. लिहिण्याचीं साधनें लांकडी लेखणी व शाई हीं असत. कधीं कधीं अणकुचीदार पोलादी पात्यानेंही लिहीत. त्या वेळीं वैद्यशास्त्राचीं मूलतत्वेंही त्या लोकांस माहित होतीं. निरनिराळे रोग व त्यांचीं कारणें या.

विषयीं चर्चा करणारें एक पुरातन पुस्तक सध्यां अस्तित्वांत आहे. रोगांची जातवारी निरनिराळ्या ऋतूंच्या अनुरोधानें केलेली असे. व वनस्पती, झाडांच्या साली, प्राणी, खनिज पदार्थ, व धान्यकण ह्या पदार्थांचा औषधयोजनेच्या कामी उपयोग होत असे.

ख्रिस्ती शकापूर्वी सुमारें एक हजार वर्षांपासून चिनी लोकांत **आडनांवाचा** प्रसार सुरू झाला आहे. त्यापूर्वी मात्र आडनांवें नव्हती. गांवावरून पडणाऱ्या आडनांवांखेरीज, नदी, पाषाण, गुहा, प्राणी, पक्षी, रंग, झाडें, फुलें, पानें, यांच्या नांवांवरूनही अनेक प्रकारचीं आडनांवें अस्तित्वांत आलेलीं आहेत. चिनी लोकांची एकंदर आडनावें सुमारें ४०० आहेत.

ख्रिस्तीशकापूर्वी २०० वर्षेपर्यंत लहान लहान संस्थानें टिकलीं होतीं. त्यानंतर मोठ्या संस्थानानें लहान संस्थानास गिळून टाकण्याचा उपक्रम सुरू झाला. अखेरीस एका बलाढ्य संस्थानानें सर्व संस्थानें गिळून टाकलीं व त्या संस्थानच्या अधिपतीनें चिनी साम्राज्याची स्थापना केली. गेलीं २ हजार वर्षे हें साम्राज्य टिकलें; मात्र तें वेळोवेळीं निरनिराळ्या राजघराण्यांच्या ताब्यांत जात आलें आहे. ज्यानें ह्या साम्राज्याची स्थापना केली त्याची युरोपियन इतिहासकार नेपोलियनबरोबर तुलना करितात. त्यानेंच आपणांस चिनचा **पहिला बादशहा** ह्मणवून घेतलें. ह्या बादशहानेंच चिनांतील उपरोक्त अवाढव्य तट बांधिला. हा तट कैद्यांच्या श्रमानें बांधलेला आहे. त्यानें आपल्या नांवाचें तांब्याचें नाणें पाडलें. त्यानें वाङ्मयाची अभिवृद्धि करण्याकरितां एक विलक्षण मार्ग काढिला. पूर्वीचीं जुनीं पुस्तकें जाळून टाकून सर्व विषयांवर नवीन पुस्तकें तयार करण्याचें त्यानें ठरविलें! मात्र कृषिशास्त्र, वैद्यशास्त्र, फलज्योतिष ह्या विषयांवरील जुनीं पुस्तकें त्यानें जाळलीं नाहींत. बाकीचीं सर्व पुस्तकें जाळण्याचा त्याचा सक्त हुकूम सुटला व तीं लपवून जपून ठेवणारे कित्येक विद्वान् ह्याच्या कारकीर्दींत फासावर चढविले गेले! हा बादशहा इ० स० पूर्वी २१० व्या वर्षी वारला. त्यानंतर त्याचा सर्वांत धाकटा मुलगा **दुसरा बादशहा** झाला. ह्या बादशहाची कारकीर्द पुष्कळ अंशीं **रिचर्ड क्रॉमवेल**प्रमाणें होती. फरक इतकाच कीं, अल्प कालांतच ह्या बादशहाचा वध होऊन साम्राज्यसत्ता **हन** घराण्यांतील पुरुषाकडे आली. हा पुरुष प्रथम केवळ एक सामान्य शेतकरी होता. परंतु, शील व पराक्रम यांच्या जोरावर तो पुढें आला व त्यानें आपलें वर्चस्व स्थापन

केलें. ह्या घराण्यानें ४०० वर्षेपर्यंत साम्राज्याचा उपभोग घेतला व तें इतकें लोकप्रिय झालें कीं, त्या घराण्याचें नांव उत्तर **चीन**मध्यें अद्यापही अभिमानास्पद मानलें जातें. ह्या ४०० वर्षांत चिनी संस्कृतीची दिवसानुदिवस प्रगतीच होत गेली. शाई, कागद व उंटाच्या केंसाचा कुंचला हे पदार्थ ह्याच कालांत तयार झाले व त्यायोगानें लेखनकला व चित्रकला यांचा उत्कर्ष होऊं लागला. मृताबरोबर त्यांच्या गुलामांना पुरण्याची जी चाल ह्या देशांत होती ती ह्याच घराण्यानें बंद करविली. आईबापांबद्दल २७ महिनेपर्यंत सुतक धरण्याची चाल होती. त्यांत दुरुस्ती करून २७ महिन्यांऐवजीं २७ दिवसांची मर्यादा ह्याच घराण्याच्या कारकीर्दीत ठरविण्यांत आली. विद्वत्तादर्शक पदव्यांची स्थापनाही ह्या राजघराण्यानें केली व **कनफ्युशियस**च्या घराण्यास कायमची सन्मानदर्शक पदवी ह्याच घराण्यानें दिली. हल्लीं कन्फ्युशियसच्या घराण्यांतील मुख्य पुरुषास इंग्रज ड्युकच्या बरोबरीची मानमान्यता आहे. ह्या राजघराण्यानें राज्यविस्तारही पुष्कळ केला. घड्याळांची कल्पनाही ह्याच कारकीर्दीत उदयास आली. गायनकलेचाही उत्कर्ष ह्याच राजवटींत झाला.

## चिनी लोकांच्या धर्मविषयक कल्पना.

चिनी लोकांचे ठायीं धार्मिकता हा गुण एकंदरींत पुष्कळ कमी आहे. धर्मभोळेपणाचा मात्र त्यांच्यांत सुकाळ आहे! परमेश्वरासंबंधानें श्रद्धा–आस्तिक्यबुद्धि–ही पुरातनकालापासून त्यांच्या समाजांत चालत आहे. परंतु बुद्धधर्माचें प्राबल्य वाढल्यापासून ह्या आस्तिक्यबुद्धीची अनास्था होत आली आहे. बुद्धधर्म हाच मुख्यतः ह्या लोकांचा धर्म आहे. बुद्ध हा सदाचार–नीति–यांच्याद्वारें लोकांचें रक्षण करितो अशी त्यांची भावना आहे. परमेश्वराच्या जाणीवेपेक्षां सदाचार–नीति–यावरच ह्या धर्माचा विशेष भर असल्यामुळें ईश्वरविषयक कल्पनांचा पगडा ह्या लोकांच्या मनावर बसलेला नाहीं. यामुळें निरनिराळे धार्मिक आचार-शिष्टाचार, रूढी ह्यांचेंच ह्या लोकांत विशेष बंड आहे. परमेश्वर आहे कीं नाहीं, याबद्दल कोणी फारसा विचार करीत नाहीं. बुद्ध संत धर्मरक्षक म्हणून पूज्य मानले जातात. पण कित्येक वेळां त्यांची टवाळीही केली जाते. जोंपर्यंत सर्व व्यवहार सुरळीत चालले आहेत तोपर्यंत चिनी मनुष्याला देवाची जरूर भासत नाहीं व आठवणही

होत नाहीं. परंतु संकटपरंपरा प्राप्त झाली ह्मणजे मात्र त्याला देवतांची आठवण होते व त्यांची कृपा संपादन करण्याकरितां तो निरनिराळे नवस–तोडगे–मंत्रतंत्र वगैरे प्रकार करूं लागतो. देवरूसपणा, जादुटोणा, जारणमारण वगैरे प्रकारांनीं चिनी लोक आपली आपत्ती दूर करण्याची खटपट करितात. बुद्ध महंत हे धर्मगुरू समजले जातात. व त्यांच्या द्वारें लोक आपल्या अनिष्ठाची शांति करितात. महंताची दिक्षा देण्याचा प्रकार कांहींसा विचित्र आहे. हा समारंभ हृदयद्रावक असतो. महंत होऊं इच्छिणाऱ्या उमेदवाराच्या टाळूस टक्कल पडण्याजोगे ३ पासून ९ पर्यंत डाग दिले जातात व त्यांच्या वेदना निमुटपणें सहन करण्याबद्दल त्या उमेदवारास महंत बनलेले लोक उपदेश करीत असतात! अशा रीतीनें यथाशास्त्र संस्कार पूर्ण झालेल्या उमेदवारास महंत पदवी प्राप्त होते व उपाध्येपणाचा दाखला मिळतो. त्याच्या आधारावर त्याला साम्राज्याच्या कोणत्याही भागांत एक रात्र वस्तीस जागा व भोजन हक्कानें मिळवितां येतें. **कन्फ्युशियस** व **टौ** ह्या दोन थोर पुरुषांनीं स्थापन केलेल्या धार्मिक पंथांचाही चीन देशांत बराच प्रसार झालेला आहे. परंतु ह्या लोकांची 'शिकवण' धर्मापेक्षां नीतीच्या सदराखालीं जास्त मोडण्याजोगी आहे. भूताखेतांचें बंड **चीन** देशांत फार आहे. त्यांत शुभ व अशुभ असे दोन प्रकार आहेत. चांगल्यांस प्रसन्न करण्याकरितां व वाईटांच्या पीडेची बाधा निवारण करण्याकरितां नानाप्रकारचे मांत्रिक व तांत्रिक छा–छूचे प्रकार तिकडे नित्य चालू असतात. भूतें व देवता अंगांत आणणें व त्यांच्या तोंडून इष्टानिष्ट गोष्टी व भविष्य वदविणें वगैरे खुळचटपणाचे प्रकारही तिकडे सडकून आहेत. ते इतके कीं, त्यांस आळा घालण्याकरितां तेथील सरकारास कायदे करणें भाग पडलेलें आहे.

नीति व सदाचार या बाबतींत सुमारें २५०० वर्षेपर्यंत चिनी लोक कनफ्युशियस ह्यास आपला मार्गदर्शक मानीत आले आहेत. ह्या नीतिशास्त्रज्ञाचा उपदेश चिनी लोकांच्या अगदीं हाडींमासीं खिळलेला असल्यामुळें इतर सर्व नीतिशास्त्रज्ञांपेक्षां सर्व **चीन**भर ह्याचेंच वर्चस्व आहे. आमच्याकडे ज्याप्रमाणें नारद, विदूर, बृहस्पति, शुक्र वगैरे नीतिशास्त्रज्ञ होऊन गेले, त्याच मासल्याचा कनफ्युशियस होता. व त्याचे नीतिविषयक ग्रंथही उपरोक्त आर्य ग्रंथकारांच्या ग्रंथांसारखेच जवळ जवळ आहेत. कंगाल झोंपडींतील शेतकऱ्यापासून तों खुद्द परमेश्वराचा पुत्र ह्मणून मानलेल्या बादशहापर्यंत

सर्वांस ह्या नीतिशास्त्रज्ञांचा उपदेश मनापासून प्रिय होत आलेला आहे. चिनी बादशहा हा परमेश्वराचा पुत्र गणला जातो. हा पुरुष दरसाल एकदां मोठ्या समारंभानें **पेकींग** येथील देवालयांत ईशस्तवन करण्याकरितां जात असतो व तेथें एकांतांत बराच काल राहून परमेश्वराची कृपा संपादन करण्याचा प्रयत्न करितो. ह्या पिता-पुत्रांचें संभाषण होतें अशी कित्येकांची समजून आहे. परमेश्वरानें एका बादशहास पत्र लिहिल्याचाही उल्लेख एका ऐतिहासिक काव्यांत आहे.

वडिलांविषयीं आदर बाळगणें, मातापितरांची निष्ठापूर्वक सेवा करणें व कोणत्याही कारणावरून त्यांचा अपमान अगर उपमर्द न करणें हीं चिनी लोकांच्या आयुष्यक्रमाची मुख्य गुरुकिल्ली आहे. तीं प्रत्येक इसमाचीं अवश्य अशीं पवित्र कर्तव्यें मानलीं आहे. ह्या कर्तव्यांची समाजास सतत जाणीव रहावी म्हणून निरनिराळया गोष्टी, कथा, दंतकथा, अनुभव वगैरे प्रकारांनीं त्यांचें महत्व नेहमीं लोकांच्या मनावर ठसविण्यांत येत असतें. कादंबऱ्या व कथा, ऐतिहासिक व काल्पनिक गोष्टी यांमधूनही पुष्कळ वेळां हेंच ध्येय प्रतिपादिलेलें असतें. ह्या कर्तव्याची चाड बाळगणें हा तिकडे राष्ट्रीय सद्गुण समजला जातो. हा सद्गुण त्या लोकांच्या अंगीं असल्यामुळें त्यांच्यामध्यें शिस्त, आत्मसंयम व संघटनाचातुर्य ह्यांची केव्हांही वाण भासत नाहीं. सचोटी, नेकी, उद्योगशीलता, करारीपणा, चिकाटी, मार्दव, सौजन्य, सभ्यपणा, स्वामीभक्ति व संतुष्टपणा हे गुणही चिनी लोकांच्या अंगी प्रमुखत्वानें दिसून येतात.

## स्त्रियांची स्थिति.

**चीन** देशांतील स्त्रियांची स्थिति बरीच समाधानकारक आहे. घरांमध्यें वडील-वयोवृद्ध-स्त्रीचें वर्चस्व कुटुंबांतील सर्व मंडळींवर असतें. चिनी लोकांत घटस्फोटाचा प्रकार नाहीं. जर एखाद्या स्त्रीस सासरीं वाईट रीतीनें वागविण्यांत आलें तर ती माहेरीं जाऊन राहते व फार तर आत्महत्त्या करिते. आत्महत्त्येचा प्रतिकार करणारा कडक कायदा तेथें नाहीं. परंतु जाचणुकीमुळें जर एखाद्या स्त्रीनें आत्महत्त्या केली तर तिचे नातेवाईक सासरच्या माणसांचा भयंकर रीतीनें सूड उगवितात व अशा घराण्याची समाजांत इभ्रत रहात नाहीं. ह्या दुहेरी पेंचामुळें असले प्रसंग कोणी येऊं देत नाहींत. घटस्फोटाची चाल जरी नाहीं तरी पुढील सातांपैकीं एक अगर अनेक कारणांवरून घटस्फोट होऊं

## लेखांक १ ला.

(१) मुल होण्याचा असंभव, (२) व्यभिचार, (३) नव आईबापांविषयीं अनास्था, (४) कापट्य, (५) चोरी (नवऱ्या घरच्या संपत्तींतून माहेर भरणें), (६) मत्सर (सवतीमत्सर), (७) रक्तपित्ती. ह्या सात कारणांस पुढील ३ अपवाद आहेतः—

(१) जर एखाद्या स्त्रीनें नवऱ्याच्या आईबापांबद्दल योग्य कालपर्यंत सूतक धरलें असेल; (२) जर तिच्या लग्नानंतर नवरा श्रीमान् झाला असेल; आणि (३) जर तिला दुसरीकडे (माहेर वगैरे) जाण्यास मार्ग नसेल तर वरील ७ कारणांकरितांही घटस्फोट करूं नये, असा नियम आहे. इतर बाबतींतही कायद्यानें पुरुषापेक्षां स्त्रीस अधिक सवलती दिलेल्या आहेत. त्या अशाः—

(१) कोणत्याही स्त्रीस राजद्रोह अथवा व्यभिचार ह्या दोन गुन्ह्यांखेरीज इतर गुन्ह्यांबद्दल कैदेची शिक्षा देण्याची मनाई आहे.

(२) कोणत्याही कारणावरून बांबूची (फटक्याची) शिक्षा स्त्रीस दिली जात नाहीं.

विधवांनां पुन्हा लग्न करण्याची शास्त्राज्ञा नाहीं; परंतु विधवाविवाहाचा प्रचार तिकडे सुरू आहे. लग्न न करणाऱ्या तरूण विधवेची स्थिति आमच्याकडील विधवेप्रमाणेंच शोचनीय असते.

लहानपणापासून स्त्रियांचे पाय बांधण्याची पद्धत तिकडे चालू आहे. त्यामुळें त्यांचे पाय आंखुड व लहान-बारिक-हातात सौंदर्याच्या बाबतीत चिनी स्त्रिया इतर राष्ट्रांस मागें टाकणार नाहीत. चिनी मुली तर फारच सुंदर व देखण्या असतात पाय बांधण्याची चाल जरी सर्वत्र आहे तरी **मँच्यू** जातीच्या कांहीं स्त्रिया व **कँटन** येथें मजुरी करणाऱ्या स्त्रिया यांचे पाय उघडेच असतात. त्यांच्या लांब वेण्या आतां नष्ट होत चालल्या आहेत. इतर सुधारलेल्या देशांतील स्त्रियांप्रमाणेच चिनी स्त्रियांचे केशकलाप आतां आढळून येतात पाय बांधण्याची चालही बंद करण्याचे प्रयत्न चालू आहेत. चिनी स्त्रियांचेठायीं अपत्यप्रेम फार उत्कट असतें. तथापि मुलींपेक्षां मुलगे असावेत अशी तिकडील स्त्रियांची भावना असते. मुलगी ही परघराण्यांत जाणारी व आईबापांस—लग्नसंबंधीं जबर खर्चांत पाडणारी असल्यामुळें मुली न होतील तर बरें, असें बहुतेक स्त्रियांस वाटत असतें. पूर्वकाळीं मुलगी झाल्यास तिचे आईबाप तिला बालपणींच मारून टाकीत, अशी आख्यायिका आहे. अजूनही असा प्रकार कोठें कोठें चालू आहे, असें परस्थ लेखकांचें ह्मणणें

आहे, पण तें खोटें ठरलेलें आहे. एकंदरींत एवढी गोष्ट खरी कीं, मुलींपेक्षां मुलांची आवड तिकडील लोकांस जास्त आहे. मुलांच्या योगानें वडिलांचीं श्राद्धकर्में होऊन कुलाची वृद्धि व उद्धार होतो, हें मुलांविषयीं जास्त आवड असण्याचें मुख्य कारण आहे. मुलींची जरी आवड नसली तरी त्या झाल्या म्हणजे कोणी टाकीत नाहीं अथवा त्यांचे कोणी हाल करीत नाहीं. चिनी लोकांत बहुभार्यत्वाची चाल आहे व धर्मपत्नीशिवाय प्रत्येकास ( पुरुषास ) एक अगर दोन इतर स्त्रिया ठेवण्याची परवानगी असते. प्रत्येक मुलाचें लग्न त्याच्या वयाच्या १८ व्या वर्षापासून २० व्या वर्षाच्या आंत करतातच. गरीब लोकांत एकच बायको करितात; पण सुखवस्तु व श्रीमान लोकांत दोन, तीन बायका करितात. तेथील बादशहाला मुख्य राणीशिवाय आणखी ७० बायका करण्याची मुभा असते. ( आतां बादशाही नष्ट झाल्यामुळें हा प्रकार आयताच बंद झाला आहे. ) चिनी स्त्रीचें आपल्या पतीवर चांगलें वजन असतें व त्याचेंही तिजवर प्रेम असतें. स्त्री हा कुटुंबाचा मुख्य आधार गणलेला आहे. मुलांचें पालनपोषण करण्याचें काम स्त्रियांचें असून त्यांनां शिक्षा–शिस्त–लावण्याचें काम घरांतील पुरुषांचें ( मुलांच्या बापांचें ) आहे, असें तिकडे मानण्यांत येतें. यामुळें बापापेक्षां मुलांनां आईचा लळा विशेष असतो. बाप प्रसंगविशेषीं कठोरपणानें वागतो; पण आई मात्र नित्य ममत्व करीत असते. ज्यांचे बाप मेलेले असतात अशा मुलांच्या आयांस–आई व बाप या दोघांचींही उपरोक्त कर्तव्यें करावीं लागतात. चिनी तरूण स्त्रियांस तरूणपणीं बऱ्याच काचांत राहवें लागतें. पण मुलेंबाळें होऊन त्या जसजशा प्रौढ होत जातात. तसतसें त्यांनां स्वातंत्र्य मिळत जातें. त्या वयोवृद्ध झाल्या म्हणजे तर कुटुंबाच्या नेतृत्वाचे सर्व अधिकार त्यांजकडे असतात. ' प्रत्येक वयोवृद्ध स्त्री ही आपल्या कुटुंबांतील ( Dowgar Empress ) महाराज्ञी आहे, ' अशी चिनी म्हण आहे. त्यावरून तिच्या सामर्थ्याची व थोरवीची योग्यता वाचकांस कळून येईल.

चिनी स्त्रिया सामान्यतः सुस्वभावी, सद्गुणी, सदाचारसंपन्न, उद्योगी, सुशील व पापभीरू असतात. कौटुंबिक सुखाचें त्या केंद्र असल्यामुळें त्यांचा जीवनक्रम पाश्चात्य राष्ट्रांतील स्त्रियांपेक्षां अधिक सुखावह असतो. ' गांव तेथें म्हारवडा ' या न्यायानें कोठें कोठें अनिष्ट प्रकार जरी आढळून आले तरी ते अपवाद होत.

## लेखांक २ रा.

# शिक्षण, वाङ्मय व तत्वज्ञान.

विद्वत्ता व वाङ्मय ह्यांसंबंधानें **चिनी** लोकांनां अतिशय प्रेम असतें. ते लोक जात्याच विद्याभिलाषी व शांततेचे भोक्त आहेत. युद्ध करणें हें त्यांच्या नीतिशास्त्रांत गौण मानलेलें आहे. व्यापारधंदा करून सुखासमाधानांत कालक्रमणा करणें हेंच त्या लोकांनां विशेष आवडतें. यामुळें युद्धकलेकडे ह्या लोकांचें आजपर्यंत बरेंच दुर्लक्ष होत आलें आहे. परंतु गेल्या पांचपन्नास वर्षांत ही स्थिति पालटत चालली आहे. सैन्य व आरमार यांचें अलीकडे त्यांस फार महत्व वाटूं लागलें असून त्यांची प्रगति करण्याविषयीं **चिनी** राष्ट्रानें गेल्या दहा वर्षांत फार जोराचे प्रयत्न सुरू केले आहेत. असें जरी आहे तरी लष्करी सत्तेपेक्षां मुलकी ( Civil ) सत्तेचेंच विशेष प्राधान्य अद्यापही तेथें आहे. पूर्वकालीं तर मुलकी सत्तेचेंच काय तें विशेष महात्म्य असे. यामुळें शिक्षण व वाङ्मय ह्या गोष्टींकडे त्या देशांत कधींही दुर्लक्ष होत नसे.

मध्यम स्थितींतील चिनी लोकांचीं मुलें लष्करी पेशापेक्षां मुलकी खात्यांत नोकरी करण्याकरितां विशेष उत्सुक असतात व त्याप्रीत्यर्थ तीं शिक्षण संपादन करितात. हिंदुस्थानांतील सिव्हिल सर्वंटांनां जशी एक अवघड परिक्षा द्यावी लागते तशाच प्रकारची अवघड परंतु कांहींशी जास्त त्रासदायक अशी परीक्षा होतकरू चिनी सरकारी अधिकाऱ्यांनां व नोकरांना द्यावी लागते. ह्या परिक्षेकरितां कनफ्युशियसचें तत्वज्ञान, प्राचिन इतिहास ( चीनचा ), मेनिशियसचें तत्वज्ञान, धर्मशास्त्र, काव्य, निबंधलेखन व कवित्व इतके विषय असतात. ह्या परिक्षेच्या कार्यक्रमांत व विषयांत अलीकडे अभियुक्त असा फरक होत चालला आहे. वरील शिक्षणपद्धतीनें चीन देशांत गतकालीं उत्तम प्रकारचे मुत्सद्दी व राजकार्यधुरंधर असे लोक निर्माण केलेले आहेत.

ही परिक्षा हें चिनी राज्यव्यवस्थेचें एक प्रमुख व अत्यंत उज्वल असें अंग आहे. ह्या परिक्षेंत पक्षपात, अन्याय वगैरे भ्रष्ट प्रकार होऊं नयेत ह्मणून फार काळजी घेण्यांत येते. परिक्षा घेण्याची पद्धति व तिचे निर्बंध अतिशय कडक आहेत. लांचलुचपत वगैरे कारणांमुळें मेहरबानी अगर पक्षपात झालेला उघडकीस आला तर अपराध्यांस प्रसंगविशेषीं मृत्युची सुद्धां शिक्षा मिळण्याचा संभव असतो !

ही परिक्षा प्रत्येक प्रांतांत दर तीन वर्षांनीं एकदां होते. त्या वेळीं **पेकींग** येथून बादशाही हुकमावरून एक बडा अधिकारी–परिक्षक–तेथें पाठविण्यांत येतो. तो परिक्षेच्या स्थानीं येऊन पोंचल्यावर त्याला एका बंगल्यांत कोंडून ठेवण्यांत येतें व त्याची कोणाशींही खासगी मुलाखत होऊं देत नाहींत. ह्या परिक्षेस वयाची मर्यादा नाहीं. यामुळें तरूण व प्रौढ–वयातीत–अशा दोन्ही प्रकारच्या विद्यार्थ्यांच्या झुंडीच्या झुंडी ह्या परिक्षेस बसण्याकरितां येत असतात. ७२ वर्षांच्या वयाचा मनुष्य एकदां ह्या परिक्षेस बसून पास झाल्याचा दाखला आहे !

परिक्षा घेण्याची वेळ होतांच परिक्षेकरितां बांधलेल्या वाड्याचे दरवाजे उघडण्यांत येऊन विद्यार्थ्यांस एकामागून एक असें आंत सोडण्यांत येतें. दरवाजावर त्यांची अत्यंत कडक रीतीनें झडती घेण्यांत येते.* आंत गेल्यावर त्यांचीं नांवें पुकारणाऱ्या अधिकाऱ्याकडून प्रत्येक विद्यार्थ्यास त्याच्या उघड्या घरकुल्याच्या नंबरचें ( open cell No. ) तिकिट त्यास देण्यांत येतें. लिहिण्याचें सामान व खाण्याची शिदोरी हीं विद्यार्थी बरोबर घेऊन येतात. सर्व विद्यार्थी आपापल्या जागेवर बसल्यावर बडा परिक्षक अधिकारी सुगंधी द्रव्यें जाळतो व वाड्याचे दरवाजे आंतून बंद करितो. परिक्षेची बैठक तीन दिवसपर्यंत चालू असते व अशा एकंदर तीन बैठकी होतात. विद्यार्थी व परिक्षक ह्या सर्वांस प्रत्येक बैठकीच्या वेळीं ३ दिवस सारखेंच कोंडून ठेवण्यांत येते. आंतून बाहेर कोणी जावयाचें नाहीं व बाहेरून आंत कोणी यावयाचें नाहीं; व विद्यार्थ्यांनीं आपलें स्थान सोडावयाचें नाहीं, असा कडक निर्बंध पाळण्यांत येतो. तिसरे दिवशीं रात्रीं विश्रांतिकरितां विद्यार्थ्यांस बाहेर सोडतात. तोंपर्यंत कोणी मेला व इतक्या गर्दींत एखादे वेळेस असा प्रकार घडून येणें अशक्य नाहीं–तरी देखील तेथील शांततेचा भंग होऊं देत नाहींत ! अशा वेळीं मृताचें शव भिंतीस टांगून ठेवण्यांत येतें व हा नियम खुद्द बड्या परिक्षक अधिकाऱ्यासही लागू आहे. त्याच्यावर असा प्रसंग आल्यास त्याचें काम त्याचा दुय्यम करितो हा दुय्यम अधिकारीही बादशाही हुकुमानेंच **पेकींग** येथून आलेला असतो.

---

* ह्या झडतींत क्वचित् विद्यार्थ्यांजवळ बारिक पुस्तकें, टिप्पणें वगैरे सांपडतात व त्याबद्दल विद्यार्थ्यांस शासनही होत असतें.

परिक्षेच्या ह्या त्रासदायक प्रकारामुळें कित्येक वेळां पुष्कळ विद्यार्थ्यांनां चित्तभ्रम झाल्याचीं उदाहरणें आहेत. कित्येकांनां तर कांहीं सुचेनासें होऊन कोरे कागद प्रश्नोत्तरांच्या ऐवजीं देण्याची पाळी येते! एकदां खुद्द बऱ्या परिक्षकालाही भ्रम झाला होता असा दाखला आहे!

ह्या परिक्षेंत यश संपादन करण्याकरितां विद्यार्थ्यांनां फार कसून अभ्यास करावा लागतो. त्यामुळें पुष्कळांच्या मेंदूवर फाजील ताण पडून त्यांपैकीं कित्येकांस वेडही लागतें असें ह्मणतात! ही परिक्षा जरी इतकी कठीण आहे तरी ती देण्याकरितां हजारों विद्यार्थी तयार होत असतात. परिक्षा झाल्यानंतर पक्षपात होण्यास अवकाश मिळूं नये ह्मणून सर्व विद्यार्थ्यांकडील उत्तरांच्या कागदांच्या तांबड्या शाईनें नकला करण्यांत येतात व त्या नकला परिक्षकाकडे तपासण्याकरितां जातात. एकंदरींत पास होण्यास पात्र असेल तोच पास व्हावा अशाबद्दल फार दक्षता बाळगण्यांत येते; आणि त्यामुळें खरे बुद्धिवान् व हुषार लोकच ह्या परिक्षेच्या चाळणींतून निवडून निघतात. ह्याच लोकांच्या हातीं राज्यकारभाराचीं सूत्रें येत असतात.

**चीन** देशांत प्राथमिक, दुय्यम व कनिष्ठप्रतीच्या पुष्कळ शाळा आहेत. बहुतेक चिनी मुलें ह्या लहान मोठ्या शाळांतून शिक्षण संपादन करितात. वरिष्ठ प्रकारच्या परिक्षा ३ आहेत. त्यांस बसण्याची सर्वांस सारखीच मुभा आहे. जे कोणी ह्यापैकीं एखाद्या तरी परिक्षेंत पास होतात ते समाजांत मान्यता पावतात. मुलाचें लग्न होण्याचे वेळीं त्याच्या परिक्षा किती पास झाल्या आहेत हें अगोदर पहाण्यांत येतें. मुलांच्या शिक्षणास खासगी व सरकारी अशा दोन्ही तऱ्हेनें उत्तेजन मिळत असतें. चिनी मूल पुस्तक वाचूं लागलें कीं, त्याचे आईबाप व आप्तइष्ट त्याच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरवितात. मुलगा गरीब असून हुषार असला तर उपरोक्त परिक्षा देण्यास तो समर्थ व्हावा ह्मणून त्याच्या जिल्ह्यांतील लोक वर्गणी जमवून त्याचा खर्च चालवितात. सर्वांत श्रेष्ठ अशी परिक्षा पास झालेल्यास वरिष्ठ प्रतीची सरकारी नोकरी मिळते व त्याचा चांगला बोलबाला होतो. त्याहून कमी दर्जाची परिक्षा पास होणारास दुय्यम प्रतीच्या सरकारी नोकऱ्या मिळतात व त्यापेक्षांही कमी योग्यतेच्या सुशिक्षितांस व्यापारी लोक नोकऱ्या देतात. कित्येक स्वतः व्यापारी बनतात व कित्येक खासगी रीतीनें शिक्षकाचा धंदा करितात.

**चीन** देशांत वाङ्मय व कला यांचें साहचर्य अनादिकालापासून आहे.

जो कोणी विद्वान असेल त्याला एखादी तरी कुशल चित्रकला, गायन, वादन वगैरे कला येत असावयाचीच असा साधारण नियम आहे. चिनी लोक काव्यभोक्ते आहेत व काव्य करणें हा एक त्यांच्या अंगचा सहज गुण आहे. छापण्याची व लिहिण्याची कला ख्रिस्ती शकापूर्वी १०४३ वर्षांपासून **चीन**मध्यें अस्तित्वांत आहे. उपरोक्त सालांत काळ्या मातीचे खिळे ( अक्षरांचे ) तेथें तयार करण्यांत आले. त्यानंतर कांहीं शतकांनीं लांकडाचे खिळे झाले व नंतर तांब्याचे व शिशाचे झाले. तथापि खिळ्यांपेक्षां शिळाछापाचें काम तिकडे विशेष लोकप्रिय झालें व गतकालीन अनेक मोठमोठीं पुस्तकें ह्या पद्धतीनें छापण्यांत आलीं आहेत. अलीकडे मात्र खिळ्या छापाचा प्रसार वाढत चालला आहे. परदेशी ग्रंथांतील आधुनिक भाषांतरें ह्याच पद्धतीनें छापलीं आहेत. चिनी लोक हे अतिशय वाचनप्रिय आहेत. यामुळें त्यांचें वाङ्मयही फार विस्तृत आहे. **पेकींग गॅझट** या नावाचें वर्तमानपत्र तेथें फार पुरातन कालापासून चालू आहे. सर्व जगांत याच्या इतकें जुनें पत्र नाहीं. हें पत्र सरकारी असून त्यांत दरबारच्या हालचाली, अधिकाऱ्यांची बहाली, बढती व दरबारचे निवडक वटहुकूम छापले जातात. हें पत्र रोज प्रसिद्ध होत असतें. प्राचीनकालीं हें हातानें लिहून प्रसिद्ध करण्यांत येत असे. परंतु इ० स० १५ व्या शतकापासून तें छापून प्रसिद्ध करण्यांत येऊं लागलें.

**चीन**मध्यें उच्च प्रकारचें वाङ्मय पुष्कळ आहे. इतिहास, चरित्रें, तत्वज्ञान, काव्य, निबंध व इतर शाखा यांत भरपूर ग्रंथसंग्रह आहे. ह्या सर्व प्रकारच्या ग्रंथांतील भाषा फार शुद्ध ( Chaste ) व भारदस्त अशी आहे. त्यांत चुकून सुद्धां ग्राम्य वाक्य अगर शब्द सांपडणार नाहीं. प्राचीनकाळीं **चीन**मध्यें स्त्रीशिक्षणाचा फारसा प्रचार नव्हता; तथापि कित्येक बुद्धिमान् स्त्रिया विद्वान होत असत. त्यांपैकीं कांहीं ग्रंथकारही होत. ह्या स्त्रियांच्या ग्रंथांतील भाषाही अशीच शुद्ध, सरस व प्रौढ अशी आहे. वर निर्दिष्ट केलेल्या ज्या वाङ्मयाच्या शाखा आहेत त्यांचीच चिनी लोक ‘ सारस्वतांत ’ गणना करितात. कादंबऱ्या, नाटकें, गोष्टी वगैरे प्रकारच्या वाङ्मयास तेथील विद्वन्मंडळांत फारसा मान नाहीं. तथापी अशा तऱ्हेचें वाङ्मयही तिकडे कमी नाहीं. ऐतिहासिक व धार्मिक तऱ्हेच्या शेंकडों कादंबऱ्या त्या वाङ्मयांत आहेत व सामान्य जनतेस त्या प्रियही आहेत. ह्या दुय्यम प्रतीच्या वाङ्मयांत मात्र शृंगारातिरेक, ग्राम्यता वगैरे दोष आहेत. कादंबरी लिहिण्याची कल्पना चिनी

लोकांनीं **मँगोल्स** लोकांपासून इ०स० च्या १३ व्या शतकांत उसनी घेतलेली आहे. तत्पूर्वी लहान लहान गोष्टी लिहिण्याची पद्धत मात्र चिनी लोकांत होती. तथापि गोष्टी किंवा कादंबऱ्या लिहिणें हें हलक्या दर्जाचें काम आहे अशी चिनी विद्वानांची समजूत असल्यामुळें कादंबरीलेखकांत नामांकित बुद्धिवान् कोणी आढळून येत नाहीं. मग प्रतिभासंपन्न कादंबरीकार कोठून निपजणार? अशा स्थितीमुळें चिनी कादंबऱ्या अगदीं सामान्य प्रतीच्या आहेत. त्यांतल्या त्यांत कांहीं बऱ्या आहेत; पण कांहीं फारच अश्लील व ग्राम्य अशा आहेत. चांगले लोक बहुधा त्या हातीं सुद्धां धरीत नाहींत. ह्या कादंबऱ्यांची भाषापद्धति अगदीं विस्कळित व सुलभ अशी असते. वरिष्ठ प्रकारच्या वाङ्मयाची भाषा कसलेली—कमावलेली व तोलून शब्दयोजना केलेली अशी असते.

चिनी कविताही अत्यंत शुद्ध व उदात्त अशी आहे. त्यांत ग्राम्यतेचा लेशही आढळून यावयाचा नाहीं. सृष्टिसौंदर्य, धर्म, तत्वज्ञान, नीति हे त्या कवितेचे मुख्य विषय आहेत. कवितेचा संग्रह फार दांडगा आहे.

**चीन** देशामध्यें वैद्यकीय विषयांच्या ग्रंथांचाही बराच मोठा संग्रह आहे. शारीरशास्त्र व छेदनकला यांचें त्या लोकांस प्राचीन काळीं फारसें ज्ञान नव्हतें; परंतु रोगोत्पत्ती व त्यांचें निवारण करणाऱ्या वनस्पति यांचें शास्त्र मात्र त्यांस चांगलें अवगत असे. चिनी लोक शरिरावर शस्त्रक्रिया करून घेण्यास फारसे खुष नसतात. शरीर जसें ( निर्माण झालें ) आलें तसेंच तें भावी लोकांत गेलें पाहिजे अशी त्यांची भोळी समजूत आहे. प्राचीन काळीं चिनी लोकांत अत्यंत नामांकित असे चार पांच वैद्य होऊन गेले आहेत. त्यांच्या योग्यतेचा विचार करितां त्यास ‘धन्वंतरी’ ही पदवी सहज लागू पडेल यांत शंका नाहीं. यांपैकीं एक दोन वैद्य शस्त्रकलेंतही निष्णात होते असें दिसतें. इ० स० च्या दुसऱ्या शतकांतील एका वैद्यानें एका लष्करी अधिकाऱ्यास ‘भूल’ देऊन त्याच्या मस्तकावर शस्त्रप्रयोग केल्याचा दाखला सांपडतो. यावरून ‘भूल’ देण्याची कल्पना ही पाश्चात्य वैद्यकांत तिचा उदय होण्यापूर्वीच **चीन** देशांत अस्तित्वांत होती, हें निर्विवाद ठरत आहे.

**चीन** देशांत तत्वज्ञानविषयक वाङ्मयही पुष्कळ आहे. तेथें जे अनेक तत्ववेत्ते झाले त्या सर्वांच्या मतांचें व ग्रंथांचें निरीक्षण करूं गेल्यास एक मोठा थोरला ग्रंथच होईल. त्यांपैकीं कांहीं प्रमुख तत्ववेत्त्यांच्या मतांचें नुसतें दिग्दर्शनच ह्या लहानशा लेखांत करितां येणार आहे. सर्व चिनी तत्ववेत्त्यांत **कन्फ्युशियस** हा अग्रणी आहे. ह्याचें नैतिक तत्वज्ञान फार उच्च

दर्जाचें असून त्याचा तेथील समाजावर विशेष पगडा बसलेला आहे. मनुष्य हा स्वभावतः सद्गुणी प्राणी असून भोंवतालच्या परिस्थितीचे अनिष्ट संस्कार त्याजवर घडल्यामुळेंच तो वाईट–दुर्गुणी–बनतो; म्हणजे परिस्थिति त्याच्यामध्यें वाईट प्रकारचे संस्कार उत्पन्न करिते,' असें **कन्फ्युशियस** याचें मुख्य मत आहे. हा निसर्गसिद्ध नियम आहे असें तो म्हणतो. हें मत त्याच्यामागून झालेल्या **मेनिशियस** नामक प्रख्यात तत्ववेत्यासही मान्य आहे. परंतु त्याच्या समकालीन असलेल्या **काऊ** नामक दुसऱ्या एका थोर तत्ववेत्यास तें मान्य नाहीं. **काऊ**चें म्हणणें असें आहे कीं, 'लांकूड, दगड इत्यादि प्रथम ओबडधोबड स्थितींत असलेल्या पदार्थांपासून ज्याप्रमाणें परिश्रमानें व कारागिरीनें निरनिराळया सुंदर उपयुक्त वस्तु बनवितात, तसेंच मनुष्याच्या अंगींही सद्गुणांचें वास्तव्य होण्यास परिश्रमपूर्वक त्यांची कमाई करावी लागते. मनुष्य हा स्वभावतः चांगलाही नाहीं व वाईटही नाहीं. लांकडाच्या ठोकळयाप्रमाणें जन्मतः तो संस्कारहीन असाच असतो. त्याजवर पुढें चांगले संस्कार **घडवून** आणले तर तो चांगला होतो व वाईट संस्कार **घडवून** आणल्यास अर्थात्च वाईट होतो. ही संस्कारक्रिया अंशतः स्वतःच्या प्रयत्नानें व अंशतः परिस्थितीप्रमाणें घडून येत असते.

**काऊ** व **मेनिशियस** ह्या दोघांनीं परस्परांचीं मतें खोडून काढण्याचा प्रयत्न केलेला आहे व यासंबंधांतला त्या दोघांचाही बुद्धिवाद तत्वजिज्ञासूंस क्षणभर तरी तल्लीन केल्यावांचून सोडणार नाहीं असा आहे. त्यापैकीं थोडासा मासला येथें देतों.

**काऊ** म्हणतो कीं, 'मनुष्याचा स्वभाव हा पाण्याप्रमाणें आहे. पाणी ज्याप्रमाणें पूर्वेकडे नेल्यास पूर्वेकडे जातें व पश्चिमेकडे नेल्यास पश्चिमेकडेही जातें; त्याचप्रमाणें मनुष्यस्वभावास चांगलें वळण लागल्यास तो चांगला बनतो व वाईट वळण लागल्यास वाईट बनतो. त्याचा ओढा निसर्गतः चांगल्याकडेही नाहीं व वाईटाकडेही नाहीं.' यावर मेनिशियस असें उत्तर देतो कीं, 'पाणी हें पूर्वेप्रमाणेंच पश्चिमेकडेही वाहूं शकतें हें खरें; पण तें जसें स्वभावतः वरून खालीं येत असतें, तसें तें खालून वर स्वाभाविकपणें जाईल काय? उंच जागेवरून खालीं पडणें–वाहणें हा जसा पाण्याचा स्वाभाविक धर्म गणला जातो तसा खालून वर पाणी जाणें गणिला जातो काय? खालून पाणी वर नेलें जातें; पण तें कार्य जबरदस्तीनें म्हणजे त्याच्या स्वाभाविक प्रवृत्तीचा भंग करून केलेलें असतें. याच न्यायानें चांगुलपणा हा मनुष्याचा स्वाभाविक धर्म

आहे व जेव्हां जेव्हां याच्या उलट प्रकार आढळून येतो तेव्हां तेव्हां तो जबरदस्तीचा ( Violence ) परिणाम आहे असें समजावें. ' जन्मतःच मनुष्यास जे संस्कार प्राप्त होतात तोच त्याचा स्वभाव व हा स्वभाव एकसारखाच असतो असें **काऊचें** ह्मणणें आहे. यावर **मेनिशियस** ह्मणतो कीं, ' तसें जर कबूल केलें तर कुत्र्याचा जो स्वभाव तो बैलाचाही स्वभाव व बैलाचा जो स्वभाव तोच मनुष्याचाही स्वभाव असें मानावें लागेल. परंतु ही चूक आहे. मनुष्यानें कितीही वाईट कर्म केलें तरी तो त्याचा उपजत गुण आहे असें मानतां येणार नाहीं. कारण सुस्थितींत पुष्कळ किंबहुना बहुतेक माणसें सुवृत्त अशींच असतात; आपत्काल आला ह्मणजेच त्यांच्या वर्तनांत दोष उत्पन्न होतात. ह्या दोन्ही अवस्था मनुष्यास उपजत प्राप्त होतात असें कसें ह्मणावें? निःसंशय त्या निरनिराळया परिस्थितीच्या कन्या आहेत. ह्या दोन तत्ववेत्त्यांमध्यें ह्याप्रमाणें बराच वादविवाद झाला; परंतु ' मनुष्याची नैसर्गिक प्रवृत्ति-स्वभाव-काय असावी? या प्रश्नाचा कायमचा निर्णय त्यांत झालेला नाहीं.

वरील दोन तत्ववेत्त्यांनंतर **हस्न त्झू** या नावाचा एक प्रख्यात तत्ववेत्ता होऊन गेला. त्याचें मत ह्या दोघांही तत्ववेत्त्यांहून भिन्न आहे. तो ह्मणतो कीं, ' मनुष्य हा स्वभावतः निःसंशय दुष्ट प्रवृत्तीचा प्राणी आहे. ' त्याला सुवृत्त करण्याकरितां आज हजारों वर्षांपासून निरनिराळया दिशेनें ( धर्म, कायदा, नीति वगैरे बंधनांनीं ) प्रयत्न चालले आहेत. तरी देखील तो अद्याप सर्वस्वी सुवृत्त-सद्गुणी-बनलेला नाहीं, असें याचें प्रतिपादन आहे. हे सर्व तत्ववेत्ते ख्रिस्तीशकापूर्वींचे आहेत. या कालांतील शेवटचा महत्वाचा तत्ववेत्ता **यांग-हिसंग** हा होय. हा ख्रिस्तीशकापूर्वीं ५३ वर्षें व ख्रिस्तीशक १८ पर्यंत होता. याचें मत असें आहे कीं, मनुष्य हा जन्मतः चांगल्या व वाईट ह्या दोन्ही प्रकारच्या संस्कारांनीं युक्त असतो. व त्यापैकीं कोणत्याही एका प्रकारच्या संस्कारांची अभिवृद्धि अगर लय होणें हें सर्वस्वी त्याच्या भोंवतालच्या परिस्थितीवर अवलंबून असतें.

यानंतर **हान यू** या नांवाचा एक महान् तत्ववेत्ता व नीतिशास्त्रज्ञ होऊन गेला, ( इ० स० ७६८-८२४. ) त्यानें ह्या विषयास कांहींसें निश्चित स्वरूप प्राप्त करून दिलें. निदान त्याचें मत सर्वांस मान्य झालें असें मानण्यास हरकत नाहीं. हा कन्फ्युशियसचा कट्टा अभिमानी होता; हा सत्याचा

भक्त होता. ‘ सत्याची महती ’ वाढविण्यास याचेच ग्रंथ विशेष कारणीभूत झालेले आहेत. मनुष्यस्वभावासंबंधानें याचें मत असें आहे कीं, मनुष्याचा स्वभाव मुख्यतः तीन प्रकारचा असतो. उत्तम, मध्यम व कनिष्ठ असे त्याचे प्रकार आहेत. उत्तम स्वभावाचीं मनुष्यें निःसंशय सद्गुणीच निपजतात. मध्यम स्वभावाचीं परिस्थितीनुरूप कधीं चांगलीं तर कधीं वाईट अशीं निपजतात व कनिष्ठ स्वभावाचीं निःसंशय वाईट निपजतात. मध्यम स्वभावाचीं माणसें चांगल्या मार्गास लागलीं तर उत्तम स्वभावाच्या माणसाच्या तोडीचीं बनतात. उलटपक्षीं, वाईट मार्गांत सांपडलीं तर अधम स्वभावाच्या माणसाच्या तोडीचीं निपजतात.

‘ दृश्य सृष्टी ’ संबंधानेंही चिनी तत्ववेत्त्यांनीं मोठमोठ्या गहन व गूढ तत्वांचें उद्घाटन केलेलें आहे. **चौंगड्झू** या नांवाच्या तत्ववेत्त्यानें ह्यासंबंधानें बऱ्याच विस्तारानें लिहिलेलें आहे. ‘ जन्म ’ व ‘ मृत्यु ’ ह्यासंबंधानेंही ह्या तत्ववेत्त्यानें सूक्ष्म विवरण केलेलें आहे. ह्या तत्ववेत्त्याचे अनुयायी व शिष्य पुष्कळ होते. ह्याचें वर्तन फार सात्विक होतें. ‘ उच्च विचार व साधी राहणी ’ ह्या तत्वानुसार त्याचा जीवनक्रम चालला होता. ह्यामुळें तो फार लोकप्रिय झाला होता. ह्याचा प्रतिस्पर्धी **होयेड्झू** नामक होता. ह्याची विचारसरणी कांहींशी विचित्र होती. तथापि तो चांगला कल्पक होता असें खुद्द **चौंगड्झू** यानेंही कबूल केलेलें आहे. त्याचे ग्रंथ लांकडाच्या चिपांवर लिहिलेले असून त्यांची संख्या पांच गाडे भरतील इतकी मोठी आहे. त्याच्या विचारसरणीचे कांहीं मासले पुढें दिले आहेत.

( १ ) नुकत्याच घातलेल्या अंड्यांत पंखें असतात; कारण ( त्यामुळेंच ) तीं पुढें उपजणाऱ्या पिलांस येतात.

( २ ) अग्नि हा कांहीं स्वभावतः उष्ण नाहीं; तर मनुष्याला तो उष्ण वाटतो—लागतो.

( ३ ) डोळा कोणतीही वस्तू पहात नाहीं; मनुष्य पहातो.

( ४ ) कंपासामुळें वर्तुळ तयार होत नाहीं; मनुष्य तें तयार करितो.

( ५ ) जें पोरकें असेल त्याला केव्हांच आई नव्हती असें म्हटलें पाहिजे. कारण ज्याला एकदां आईचा संस्कार झाला असेल त्याला पोरकें म्हणतां येणार नाहीं.

याप्रमाणें चिनी तत्ववेत्ते व त्यांचें तत्वज्ञान यांची हालहवाल आहे.

## लेखांक ३ रा.

## कायदा व राज्यव्यवस्था.

**चीन** देशाची संस्कृति सर्व युरोपियन राष्ट्रांहून अत्यंत जुनी व कांहीं अंशीं आर्यसंस्कृतीशीं सादृश्य असणारी अशी आहे. अर्थात्, 'कायदा व शासनपद्धति' हीं जीं मानवसमाजाचीं दोन परिणत प्रमुख अंगें, त्यांचें अस्तित्व चीन देशांत ख्रिस्तीशकाच्या पूर्वींही असलेलें दिसून येतें. चिनी राष्ट्रासंबंधानें आज जी माहिती उपलब्ध आहे, तिचें पर्यालोचन केल्यास चिनी मानवसमाज अगदीं रानटी स्थितींत होता कीं नाहीं व असल्यास कधीं व कितपत होता, या प्रश्नांचीं उत्तरें कोणासही समाधानकारकरीतीनें देतां येणार नाहींत. 'कांहीं शतकांपूर्वीं कित्येक युरोपियन राष्ट्रें अंगाला रंग लावून व कातडीं पांघरून रानटी अवस्थेंत नांदत होतीं.' असें विधान कोणत्याही इतिहासकारास जसें बिनदिक्कत करतां येतें तसें विधान चीनसंबंधानें मात्र त्यास करतां येणार नाहीं. यावरून गतकालांत चीन देश सर्वतोपरी परिणतावस्थेस जाऊन पोंचला होता असा अर्थ समजावयाचा नाहीं. वरील लिहिण्याचा इत्यर्थ इतकाच कीं, इतिहासाला ठाऊक असलेला चीन देशचा कोणताही काल घेतला तरी त्यांत सुधारलेल्या समाजाचीं लक्षणें कमजास्त प्रमाणांत परंतु ठळकपणें दिसून येतात.

ख्रिस्तीशकाच्या पूर्वींपासून चीन देशामध्यें, पंचायती, राज्यसंस्था, न्यायसंस्था लोकप्रिय अशी धारेपद्धति, सुव्यवस्थित पिनल कोड, कस्टम्स–व्यापारसंबंधीं कर–सामाजिक निर्बंध ऊर्फ कायदे, नाणीं, मापें, वजनें इत्यादि सुधारलेल्या मानवसमाजांत असणाऱ्या बाबी चांगल्या स्थितींत अस्तित्वांत होत्या. त्यासंबंधीं कांहीं माहिती प्रस्तुत लेखांत देण्याचें योजलें आहे.

इतिहासाला अवगत असलेल्या अगदीं पहिल्या काळांत–अर्थात् ख्रिस्तीशकापूर्वीं–नाण्याच्या ऐवजीं शिंपले, रेशमाचे व तागाचे तुकडे यांचा उपयोग केला जात असे. त्यानंतर पुढें तांब्याच्या तुकड्यांत मध्यभागीं भोंक पाडून त्याचा उपयोग नाण्याकरितां होऊं लागला. पुढें तांबें, रुपें व सोनें यांचीं नाणीं अक्षरें व चित्रें यांसहित पाडण्यांत येऊं लागलीं व ख्रिस्ती शकाच्या ९ व्या शतकापासून हुंड्यांचा प्रचार सुरू झाला आणि १२ व्या शतकांत नोटा सुरू झाल्या. हल्लीं ह्या नोटांचा प्रसार सर्व प्रांतांत फैलावला

आहे. आठ बारा आण्यांपर्यंत किंमतीच्याही नोटा तिकडे चालू आहेत. चीन देशांतील मापें जवांवर ठरविलेलीं आहेत. दहा जव एकापुढें एक मांडले म्हणजे एक इंच होतो. असे दहा इंच झाले म्हणजे एक फूट व असे १० फूट म्हणजे एक चंग होतो. तोलण्याचीं वजनें इंग्रजी औंस व पौंड यांच्या बरोबरीचीं आहेत. त्यांचे पौंडाचा आकार खोरें अगर टिकाव यांच्या डोक्यासारखा असतो. वजनें व मापें यांचा व्यवहार इकडीलप्रमाणेंच निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळ्या प्रकारचा आहे. तसेंच शिंपी, सुतार, तेली, दारूविक्या यांच्या परस्पर मापांमध्येंही थोडेंबहुत अंतर असतें. यामुळें नवीन मनुष्य तेथें गेल्यास प्रथम कांहीं दिवस-सर्व मापांची माहिती होईपर्यंत-त्याची मोठी गैरसोय होते.

ख्रिस्ती शकापूर्वी २०० वर्षांपासून चीन देशांत बादशाही राजसत्ता स्थापन झाली. तेव्हांपासून तिच्या स्वरूपांत वेळोवेळीं जरी थोडेबहुत फेरफार झाले असले तरी एकंदरींत तिचें मूळचें स्थूल स्वरूप परवांच्या क्रांतीपर्यंत अबाधितपणें चालत आलें होतें.

चीनमधील प्रत्येक इंच जमीन तेथील सरकारची-अर्थात् बादशहाच्या मालकीची-आहे. परदेशांतील लोकांनीं तेथें अनेक जमिनी आपल्या वहिवाटीस घेतल्या आहेत. परंतु त्या जमिनींची मालकी त्यांच्याकडे नाहीं. त्या त्यांनीं सरकारी पट्ट्याच्या आधारें स्वामित्वाबद्दल ठराविक रक्कम देण्याचें कबूल करून सततच्या करारानें घेतलेल्या आहेत. रयतेचीही गोष्ट अशीच आहे. जमिनीवरील धारा हें चिनी सरकारचें मुख्य उत्पन्न आहे. हा धारा जमिनीचें मान पाहून ठरविण्यांत येतो व तो वसूल करण्याचे कामीं शेतकऱ्याला शक्य तितक्या सवलती देण्यांत येतात. **सारा वसुलीच्या बाबतींत तिकडे सहसा कधीं कोणावर जुलूम होत नाहीं**. जेव्हां पीक बुडालें असेल तेव्हां शेतकरी देईल तेवढा सारा अधिकारी घेतात व बाकीचा माफ करतात. तसेंच द्रव्याच्या ऐवजीं धान्यही कोठें कोठें साऱ्याबद्दल घेतात. एकंदरींत **शेतकऱ्यांनां संतुष्ट व सुखी राखण्यांत चिनी सरकार आपली परकाष्ठा करीत असतें.** जमीनधाऱ्याच्या उत्पन्नाखेरीज दुसरें महत्वाचें उत्पन्न मिठावरील कराचें आहे. त्याचप्रमाणें कस्टमचें उत्पन्नही महत्वाचें आहे. यांखेरीज इतर किरकोळ करांच्या बाबीही लोकमतानुसार ठरलेल्या आहेत.

वरील सर्व प्रकारचे करांपैकीं कोणताही कर जास्त वाढविणें झाल्यास तेथील अधिकाऱ्यांनां अगोदर लोकांची संमति घेणें भाग पडतें. तसें न करितां कराची वाढ केल्यास त्या कराविरुद्ध लोकमत इतकें खवळतें कीं, तो कर वसूल करणें जवळ जवळ अशक्य होऊन जातें ! या कारणाकरितां अधिकारी लोक बहुधा असलें धाडस कधीं करीत नाहींत. जर एखादा कर वाढवावयाचें त्यांचे मनांत आलें तर ते आपल्या प्रांतांतील मोठमोठे व्यापारी, प्रतिष्ठित लोक व ज्यांचा त्या कराशीं विशेष निकटसंबंध येत असेल असे लोक अथवा त्यांचे प्रतिनिधी यांनां प्रथम आपल्याकडे बोलावून घेऊन त्यांच्याशीं बुद्धिवाद करितात व त्यांत जर त्यांस यश आलें-ह्मणजे जर त्या लोकांची संमति मिळाली–तर तो कर वाढविण्यासंबंधाचे जाहिरनामे पुढें प्रसिद्ध होतात. जर कोणी याखेरीज अन्य मार्गानें कर वाढवूं ह्मणेल तर त्याचे परिणाम फार अनिष्ट होण्याचा दृढ संभव असतो.*

चिनी–शासनपद्धति ऊर्फ राज्यसंस्था एकतंत्री आहे. परंतु तिच्या द्वारें होणारा राज्यकारभार मात्र लोकसत्ताक राज्यपद्धतीच्या धर्तीवर होत आलेला आहे. ख्रिस्तीशकापूर्वी ( ३७२ ते २८९ वर्षांच्या दरम्यान ) मेन्‌सियस नामक एक प्रख्यात तत्ववेत्ता चीनमध्यें होऊन गेला. त्यानें ‘ राष्ट्रीय महत्वाच्या दृष्टीनें प्रथम लोक नंतर ईश्वर आणि त्याच्या नंतर राजा ’ अशी विचारसरणी प्रचलित केली असून ती चिनी लोकांच्या हाडींमासीं पूर्णपणें खिळलेली आहे. यामुळें तेथील राजसत्ता एकतंत्री असूनही तेथील कारभारांत लोकमताचें

---

* तो कसा हें एका इंग्रजानें पुढीलप्रमाणें सांगितलें आहे. Any other method may lead to disastrous result. The people refuse to pay and coercion is met atonce by a general closing of shops and stoppage of trade, or, in more serious cases, by an attack on the official residence of the offending Mandrin who soon sees his house looted and levelled with the ground. In other wards, the Chinese people tax themselves.

Giles on *CHI.CIVI.*

प्राबल्य असलेलें दिसून येतें. **चिनी लोकांचा मुख्य विशेष असा आहे कीं, ते अन्याय कधींही सहन करीत नाहींत.** उलटपक्षीं स्वतःच्या इच्छेनें त्यांनीं जे कायदे आपणावर लादून घेतले असतील ते कितीही कठोर असले तरी त्यांबद्दल ते कधीं कुरकुर करीत नाहींत. ते, ते मोठ्या आनंदानें पाळतात. चीन देशावर आजपर्यंत अनेक राजघराण्यांनीं बादशाही सत्ता गाजविली आहे. ह्यांपैकीं प्रत्येक घराण्यानें निरनिराळे कायदे वेळोवेळीं केले आहेत. परंतु त्या सर्वांचें ध्येय मागच्यापेक्षां आपण अधिक सुधारणा करावी असेंच असलेलें दिसून येतें. उदाहरणार्थ एक पिनल कोडच घेऊं. ह्या कोडाची रचना २ हजार वर्षांपासून आजपर्यंत कसकशी होत गेली हें पाहिलें तर आपणांस असें स्पष्ट दिसून येईल कीं, चीनमध्यें आजपर्यंत होऊन गेलेल्या प्रत्येक राजघराण्यानें आपल्या मागच्या राजघराण्याच्या कारकीर्दीतील कोडापेक्षां आपल्या कारकीर्दीतील कोड अधिक सुखावह व सौम्य करण्याचा यत्न केलेला आहे.

सध्यां जें पिनल कोड तेथें अमलांत आहे तें तर कोणत्याही सुधारलेल्या राष्ट्रास शोभेलसें आहे; इतकेंच नव्हे तर कांहीं बाबतींत इतरांहून अधिक सरस आहे. उदाहरणार्थ, ज्या अपराध्यांस मृत्युची शिक्षा झाली असेल त्यांनां मरणसमयींचें दुःख कमी व्हावें ह्मणून स्वतःच्या अगर मित्राच्या खर्चानें अफू अथवा दुसरा कोणताही निशा उत्पन्न करणारा पदार्थ सेवन करण्याची सवलत दिलेली आहे. कधीं कधीं अधिकारी लोकही अशा अपराध्यांस निशायुक्त पेयें देऊन मग वधस्थानाकडे पाठवीत असत, अशी आख्याइका चीन देशांत अद्याप प्रचलित आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत गरमी सक्त असल्यामुळें पिनल कोडांत सांगितलेल्या कित्येक शिक्षा अमलांत आणल्या जात नाहींत. तसेंच एखाद्यानें गुन्हा कबूल करतांच पश्चात्तापपूर्वक अधिकाऱ्याजवळ येऊन आपला अपराध कबूल केला तर कित्येक गुन्ह्यांचे बाबतींत त्यास पूर्ण माफी मिळते. चोरी करणारानेंही जर पश्चात्तापपूर्वक चोरलेली वस्तू मालकास तत्काल परत दिली तर त्यासही माफी मिळते. त्याचप्रमाणें गुन्हेगार जरी निरढावलेला असला तरी प्रत्येक वेळेस त्याजवर असलेल्या मुख्य गुन्ह्यापुरतीच शिक्षा त्यास देण्यांत येते. **गुन्हेगाराचे सोबती अगर आप्तेष्ट यांस कधींही त्रास दिला जात नाहीं.** यामुळें रयतेवर पोलीसचा जुलूम तेथें फारसा होऊं शकत नाहीं. गुन्हेगाराच्या बाबतींत मात्र कबुलीजबाब काढण्याकरितां हा जुलूम होऊं शकतो;

परंतु, त्यास आळा घालणारे इतके नियम आहत कीं, त्यासंबंधांत जुलूम करणें जवळ जवळ अशक्यच होतें. अपराध्यावर जुलूम झाला अगर त्याचा निष्कारण छळ झाला तर ती गोष्ट उघडकीस येण्यास पुष्कळ साधनें करून ठेविलीं आहेत. आणि जर कां ती गोष्ट उघडकीस आली तर पोलीस व त्यांच्यावरील मॅजिस्ट्रेट या दोघांसही कडक शासन होतें. याखेरीज समाजांत त्यांची अप्रतिष्ठा होऊन त्यांचें महत्व नष्ट होतें. त्यामुळें त्यांचा खासगी आयुष्यक्रमही कष्टमय होतो. अशी व्यवस्था असल्यामुळें होतां होईल तोंपर्यंत कबुलीजबाब काढण्याकरितां अपराध्याचे हाल करण्यास कोणी प्रवृत्त होत नाहीं. जीवित व मालमत्ता यांचा सुरक्षितपणा चीन देशांत चांगला आहे. मृत्यूच्या शिक्षेचा अंमल खुद्द बादशाहाच्या–अर्थात् **पेकीन**च्या प्रधान मंडळाच्या–हुकुमावांचून सहसा केला जात नाहीं. यास कांहीं थोडे अपवाद आहेत. परंतु सर्वसाधारण नियम वरील प्रकारचाच आहे. अपवादादाखल कांहीं भयंकर गुन्हेगारांस तत्काल देहांतशासन करण्याचा आधिकार मोठमोठ्या अधिकाऱ्यांनां दिलेला असतो. परंतु त्याची अंमलबजावणी त्यांनीं सर्वस्वी आपल्या जबाबदारीवर करावयाची असते. त्यांच्या असल्या कृत्यानें अन्याय झाला अगर शांततेचा भंग झाला तर त्याची सर्व जबाबदारी त्यांचे शिरावर असते. त्याचें परिमार्जन त्यांचें त्यांनीं न केल्यास त्याबद्दल त्यांस वरिष्ठ सरकारास जाब द्यावा लागतो व क्वचित प्रसंगीं शासनही भोगावें लागतें. चिनी पिनल कोडाचे आणखी एक दोन **विशेष** लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. आईबापाच्या मृत्युनंतर २७ महिनेपर्यंत लग्नसमारंभ करण्याची मनाई असते. तसेंच ह्या कालांत मृताच्या जवळच्या नातलगांनीं गायनवादनादि प्रकारांपासूनही अलिप्त राहिलें पाहिजे. सरकारी अधिकाऱ्यांसही हा काल एकांतवासांत घालवावा लागतो. मात्र कांहीं मोठ्या अधिकाऱ्यांच्या–ज्यांना सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें आपल्या कामावर हजर असणें जरूर असतें त्यांच्या—बाबतींत हा नियम अंमलांत आणीत नाहींत. अशा बाबतींत बादशहाच्या खास परवानगीनें सूतकाचा काल तीन किंवा एक महिन्याचा ठरविण्यांत येतो व तेवढा काल मात्र सदर अधिकाऱ्यानें घरीं राहून घालवावा लागतो.

बादशहाच्या मृत्युबद्दल राष्ट्रीय सूतक पाळावें लागतें. १०० दिवसपर्यंत कोणी हजामत करतां कामा नये व स्त्रियांनीं डोक्याचे अलंकार घालतां

कामा नयेत. अधिकारी लोकांनीं एक वर्षपर्यंत लग्नकार्य करितां कामा नये. इतर प्रजेला १०० दिवसांनंतर तें करण्याची मुभा आहे. १००० दिवसपर्यंत नाटकशाळाही बंद असतात. ह्या कालांत न्हावी, नट वगैरे लोकांनां उपासमार करण्याचा प्रसंग आल्यास त्यांस सरकारांतून अन्न मिळतें. एका आडनावाच्या कुटुंबांत परस्पर लग्नविधी होत नाहींत. परंतु कित्येक जिल्ह्यांत एकाच आडनांवाचे हजारों लोक असल्यामुळें अशा ठिकाणीं हा नियम लागू नाहीं. तथापि, तेथें ज्यांच्या पिढ्या तुटल्या आहेत, अशाच घराण्यांशीं शरीरसंबंध करण्याचा नियम आहे. प्रेतदहन व जलसमाधी ह्या दोन्ही गोष्टी कायद्यानें मना केलेल्या आहेत. तथापि एखादा मनुष्य आपल्या घरापासून फार लांब असलेल्या प्रदेशांत मरण पावला तर त्याचें प्रेत दहन करण्याची परवानगी मिळते. कारण दहनाच्या योगानें मृताच्या आत्म्याला तत्काल संचार करितां येतो व त्यामुळें त्यास आपल्या जन्मभूमीस तत्काल जातां येतें अशी चिनी लोकांची समजूत आहे. प्रेतें जाळावयास जरी मनाई आहे तरी बौध्य धर्मोपदेशकांचीं प्रेतें जाळण्यास आडकाठी नाहीं.*

दिवाणी व फौजदारी कायद्यांची अंमलबजावणी पुष्कळ दयार्द्र दृष्टीनें करण्यांत येते. उदाहरणार्थ, ' चोरी ' हा फौजदारी गुन्हा आहे. परंतु उपासमारामुळें माणसानें भक्षणाचे पदार्थ चोरल्यास कोणताही मॅजिस्ट्रेट त्याबद्दल शिक्षा देणार नाहीं. रोटीवाले, धान्यसंग्रह करणारे, शेतकरी यांचे आत्म-

---

* बुद्ध धर्माचा उपदेशक मरण पावला ह्मणजे त्यास एका खुर्चीवर बसवून नंतर ती खुर्ची एका लांकडी पेटींत ठेवितात. मग ठराविक दिवशीं ती पेटी मोठ्या थाटानें स्मशानभूमीकडे दहन करण्याकरितां नेतात. त्या वेळीं मृताचे इतर सहचर पाली भाषेत असलेले मंत्र ह्मणत असतात. स्मशानांत पोंचल्यावर तेथें चिता रचून तींत तेल ओततात व नंतर तीवर प्रेताची पेटी ठेवून तीस अग्नी लावतात. प्रेत दहन झाल्यानंतर रक्षा जमा करून ती जपून ठेवतात व पुढें मृताच्या योग्यतेप्रमाणें तिजवर स्मारक बांधण्यांत येतें. बुद्ध भिक्षु वृद्ध झाले ह्मणजे त्यांनां विश्रांति घेण्याकरितां ह्मणून राखून ठेवलेल्या जागेंत राहण्याकरितां पाठवितात. तेथें ते समाधी लावून कालक्रमण करीत असतात.

संरक्षणार्थ व मालमत्तेचे संरक्षणार्थ मोठमोठे संघ आहेत आणि जो कोणी चोर त्यांच्या सपाट्यांत सांपडेल त्याचें तत्काल ते पारिपत्य करीत असल्यामुळें सहसा त्यांच्या वाटेस कोणी जात नाहीं. **चिनी सरकार भांडखोरपणास बिलकुल उत्तेजन देत नाहीं.** वादी लोकांनां कोर्टांकडून इतरत्र मिळणाऱ्या सवलती ह्या देशांत मिळत नाहींत. तेथें वकिलीचा धंदा उत्पन्न झालेला नाहीं. इतकेंच नव्हे तर कोर्टांत वादी प्रतिवादीस जे कोणी मदत करीत असतील ते मॅजिस्ट्रेट अगर कोर्ट यांच्या अवकृपेस पात्र होतात. याचा मुख्य हेतू लोकांनीं वाद माजवूं नयेत हाच असतो. व्यापारसंबंधीं खटले व दिवाणी कामकाज होतां होईल तोंपर्यंत पंचायतीपुढें चालतें; व अधिकाऱ्यांच्या कानावर जाण्यापूर्वींच निकालांत निघतें. चिनी माणूस कोर्टांत पाऊल टाकण्यास सामान्यतः नाखुष असतो. कारण तेथें दोन्ही पक्षास बुड सोसावी लागते हें त्यास पक्कें ठाऊक असतें.

चिनी अधिकाऱ्यांस ठराविक पगार मिळण्याची व्यवस्था नाहीं ( अलीकडे ती झाली आहे. ) प्रत्येक अधिकाऱ्यानें वसुलाच्या मानानें, झालेल्या वसुलांतून आपला पगार कापून घेऊन बाकीचा वसूल वरिष्ठाकडे पाठवावयाचा; त्याच्या वरिष्ठानेंही तसेंच करावयाचें असा क्रम अगदीं वरिष्ठ प्रतीच्या अधिकाऱ्यापर्यंत चालू असे. ही पद्धत कांहींशी सदोष असल्यामुळें युरोपियन लोकांनीं तिजवर टीकेचा भडिमार केलेला आहे. परंतु ह्या सदोष पद्धतीचा अंमल सुरू असतांही कोणाही अधिकाऱ्याकडून वसुलीच्या बाबतींत प्रजेवर जुलूम होऊं शकत नाहीं; कारण लोकांमध्यें असा जुलूम झाल्यास तो हाणून पाडण्याचें सामर्थ्य असतें असें युरोपियन लोकांचेंच मत आहे.* असल्या सदोष पद्धतींतही पुष्कळ अधिकारी लोकांच्या सन्मानास पात्र होतात, ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

चीन देशांत म्युनिसिपालट्यांची स्थापना नुकतीच झालेली आहे. त्यापूर्वीं प्रत्येक गावांतील व शहरांतील लोक–विशेषतः श्रीमंत लोक स्वयंस्फूर्तीनें

---

* Few officials overstep the limits which custom has assigned to their posts, and those who do generally come to grief.

Mr. Giles on Civi. of China.

आपल्या गांवची स्वच्छता राखीत असत. गांवाच्या बंदोबस्ताकरितां प्रत्येक गांवाचे वॉर्ड ( भाग ) केलेले असत व त्या त्या भागाच्या निरनिराळ्या वेशी असून त्या प्रत्येकीवर रात्रीं एकेक पहारेकरी असे. अपरात्रपर्यंत घराबाहेर राहण्याची व कंदिलावांचून रात्रीं बाहेर पडण्याची मनाई असे.

चिनी परगण्यांतील कोणत्याही गांवांतून जर कोणी माणूस जात असला आणि त्यास गुप्तपणें एखाद्यानें दगड मारला तर त्याबद्दलची तक्रार त्यानें योग्य अधिकाऱ्याकडे नेतांच, ज्या हद्दींत त्याजवर दगड मारला गेला असेल त्या हद्दींतील ग्रामाधिकाऱ्यांस बोलावून आणून दंड करण्यांत येतो. यामुळें अशा प्रकारची वर्तणूक आपल्या हद्दींत कोणी करूं नये ह्मणून ग्रामाधिकारी फार दक्ष रहातात. याचप्रमाणें मुलांच्या अपराधाबद्दल त्यांच्या आईबापांस व नोकरांच्या अपराधाबद्दल त्यांच्या मालकांस जबाबदार धरण्यांत येतें. याप्रमाणें चीन देशांतील कायद्यांचें व राज्यव्यवस्थेचें सामान्य धोरण आहे. आतां, त्या देशांत आजपर्यंत जीं प्रख्यात राजघराणीं व राज्यकर्ते होऊन गेले त्यांची थोडीशी माहिती देऊन हा लेख पुरा करूं.

चीनमध्यें बादशाही सत्ता कधीं व कशी स्थापन झाली आणि त्यानंतर लवकरच ती प्रसिद्ध अशा **हन** घराण्याकडे कशी गेली यासंबंधींची माहिती पहिल्या लेखांकांत आलीच आहे. या **हन** घराण्याचा शेवट इ० स० २२० च्या सुमारास झाला. बेबंदशाही, रंगेलपणा, कपटकारस्थानें इत्यादि कारणांमुळें देशांत अस्वस्थता माजून एक मोठें बंड झालें व त्या बंडांत **हन** राजघराण्याचा विध्वंस होऊन चीन देशांत ३ निरनिराळीं राज्यें स्थापन झालीं. हे तिन्ही राजे नेहमीं आपापसांत लढत असत. त्यांच्या ह्या युद्धांची हकीकत कादंबरीरूपाने चिनी ग्रंथकारांनीं लिहून ठेवलेली आहे. हीं तीन राज्यें इ. स. २६५ पर्यंत टिकलीं. नंतर **चिन्** नामक राजघराण्यानें त्या सर्वांस जिंकून एकछत्री अंमल सुरू केला. ह्या राजघराण्याच्या अमदानींत तार्तर लोकांनीं उत्तर चीनवर सतत हल्ले करून त्यांस जेरीस आणलें. तार्तर लोकांचा पराभव पुढे **टोबा** नामक राजघराण्यांतील पुरुषानें केला व तेव्हांपासून उत्तरचिनांत ह्या घराण्याचें वर्चस्व माजलें. ह्या राजघराण्यानें उत्तरचीनवर सुमारें २०० वर्षें राज्य केलें व त्या काळांत दक्षिण चीनमध्यें लहान लहान स्वदेशी संस्थानें होतीं. टोबा राजघराणें हें मांगोलियन जातीचें होतें असें दिसतें. यांच्या अमदानींत जपान चीनला खंडणी देऊं लागलें व ह्या दोन्ही राष्ट्रांचे वकील

परस्परांच्या दरबारीं जाऊं येऊं लागले. या राजघराण्यानें कोरिया प्रांत जिंकण्याचा प्रयत्न केला होता व त्यानें सयाम देशापर्यंत आपले वकील पाठविले होते. यांच्याच कारकीर्दींत बुद्धधर्माचा चीनमध्यें विशेष फैलाव झाला. या अमदानींतच ( इ० स० ३९९ ) **फशैन** नामक बुद्ध धर्मोपाध्याय मध्यचीनांतून निघून हिंदुकुश पर्वताच्या रस्त्यानें हिंदुस्थानांत आला व तेथून सिलोन, सुमात्रा वगैरे ठिकाणीं गेला. पाटणा, बनारस व बुद्धगया इत्यादि हिंदुस्थानांतील क्षेत्रांचें वर्णन त्याच्या प्रवासवृत्तांत आहे. त्यावरून तो या ठिकाणीं कांहीं दिवस राहिला असावा असें दिसतें. सिलोनमध्यें तर तो तीन वर्षें होता. सुमारें १५ वर्षांनीं तो परत आपल्या देशास गेला.

इ० स० ६१८ च्या सुमारास चीनची राजसत्ता **टंग** नामक राजघराकडे आली. या घराण्यानें ३०० वर्षेपर्यंत राज्य केलें. या घराण्यांतील राजपुरुषांच्या कारकीर्दींत चीन देशाची पुष्कळ भरभराट होऊन त्यास सुखशांततेचा लाभ झाला. यांचे कारकीर्दींत सर्वत्र एकछत्री अंमल सुरू होऊन जनतेमध्येंही एकराष्ट्रीयत्वाच्या दृष्टीनें ऐक्य झालें. या राजघराण्याचें नांव दक्षिण चीनमध्यें अद्यापही अभिमानपूर्वक निघत असतें. **हन** राजघराण्याचे अंमदानींत ज्याप्रमाणें **लु** नामक स्त्री राज्यकर्ती होऊन गेली त्याचप्रमाणें ह्या घराण्यांतही **वू** नामक राज्यकर्ती होऊन गेली. हिनें आपल्या सवतीच्या मुलाची गादी बळकावली होती. हिच्या अंगीं **लु** पेक्षां अधिक कर्तृत्व व अधिक बुद्धिमत्ता होती. तिनें अगदीं करडा अंमल गाजविला. वृद्धापकाल झाल्यावर मात्र तिचें सामर्थ्य शिथिल झालें आणि मग तिच्या मंत्र्यांनीं तिला गादीवरून काढून टाकून योग्य वारसास गादीवर बसविलें. तरूणपणीं तिनें कोणाचीही मात्रा चालूं दिली नाहीं. तिचा नवरा मेल्यावर ती भरदरबारांत पुरुषासारखी कृत्रीम दाढीमिशा लावून बसत असे. इ० स० ६९४ त तिनें स्वतः ' देवी ' हा किताब धारण केला. आणि उत्तरोत्तर तिची वागणूक फार उर्मटपणाची होऊं लागली. अर्थात् त्यामुळें ती भोंवतालच्या लोकांस अप्रिय होऊं लागली. हिनें स्त्री व पुरुष यांस समान लेखण्याचा क्रम सुरू केला. हिनें स्त्रियांनां सार्वजनिक ऊर्फ सरकारी नोकऱ्यांकरितां परिक्षेस बसण्याची परवानगी दिली आणि परिक्षेंत पसार होणाऱ्यांस नोकऱ्या दिल्या. कोर्टांमध्यें साक्षीपुरावा देतांनां गुडघे टेकण्याची तिकडे रीत आहे. त्या बाबतींत स्त्रियांनां हिनें माफी दिली होती. स्त्रियांनां पुरुषांच्या बरोबरीनें वागविण्याचा

तिचा हा प्रयत्न ती गादीवरून दूर होतांच शिथिल पडला व पुढें त्यास कोणी फारसें उचलून धरलें नाहीं. ह्या राणीनंतर ह्या घराण्यांत झालेली प्रख्यात व्यक्ति **मिंग-हंग** ही होय. हा बादशहा मोठा शूर, धाडसी, विलासप्रिय व वाङ्मय आणि विद्या यांचा भोक्ता होता. तो० इ० स० ७१२ मध्यें गादीवर बसला. याचे कारकीर्दींत गांवोगांव शाळा स्थापन करण्यांत आल्या. स्त्री व पुरुष या दोघांनांही वादनकला शिकविण्याकरितां त्यानें एक मोठें विद्यालय स्थापन केलें होतें. त्याची युद्धप्रियता व फाजील खर्च करण्याची प्रवृत्ति यांमुळें जनतेवर करांचा बोजा फार वाढला. त्या कारणानें लोकांत असंतोष माजून पुढें लवकरच मोठें बंड झालें. त्याच्या दरबारीं अनेक विद्वान व कलाभिज्ञ लोक असत. त्यानें एक अंगवस्त्र बाळगलें होतें. तिचें नांव **क्वायफे** असें होतें. तिच्या नादांत असतां यानें कित्येक हिजड्यांनां मोठ्या अधिकारावर नेमलें होतें. याच्या कारकीर्दींत स्त्रियांनीं बुरखे घेण्याचें सोडून दिलें होतें. धर्मभोळेपणा, स्वैराचार इत्यादि गोष्टींस याच्या कारकीर्दीच्या अखेरीस उत्तेजन मिळत गेलें. या सर्वांचा परिणाम लोकक्षोभ व बंड यांत झाला (इ. स.७५५) तेव्हां हा बादशहा पळून जाऊं लागला; त्या वेळीं त्याच्या शिपायांनीं बंड करून त्याच्या घराण्यांतील कित्येक अयोग्य माणसें मोठ्या जागेवर होतीं तीं आपल्या ताब्यांत घेण्याचा आग्रह त्यानीं धरला; तसेंच त्यानीं बादशहाच्या उपरोक्त अंगवस्त्रास बादशहाकडून जबरीनें देहांत शासन करविलें. तिचा वध झाल्यानंतर त्यानीं तिच्या कुटुंबाचीही वाताहात करून टाकली. पुढें त्यांचा व लोकांचा क्षोभ शांत करण्याकरितां सदर बादशहानें आपण राज्यकारभारांतून मन काढून आपल्या मुलास गादीवर बसविलें. ह्या उत्पातासंबंधीं एक मोठें सुंदर काव्य भावी कालांतील एका कवीनें केलेलें आहे व तें फार लोकप्रिय झालेलें आहे. या बादशहाच्या मृत्युनंतर पुढें लवकरच ह्या घराण्याचा नाश झाला. त्यानंतर सुमारें पांच निरनिराळ्या राजघराण्यांनीं चीनवर बादशाही सत्ता गाजविली. पण त्यांच्यांत विशेष नांव घेण्यासारखा कोणी पुरुष निपजला नाहीं. ह्या ५ घराण्यांनीं मिळून सुमारें ५० वर्षें राज्य केलें. नंतर **सूंग** नामक राजघराण्याचे हातीं तेथील राजसूत्रें आलीं. हें राजघराणें सुमारें ३०० वर्षेंपर्यंत टिकलें. याच्या कारकीर्दींत चीन देशाची अनेक बाजूंनीं प्रगति होत गेली. या वेळेस झालेली सुधारणा अद्याप चालत आलेली आहे. ह्या ३०० वर्षांच्या कालांत चीनमध्यें शेकडो [illegible]

कवि, इतिहासकार, टीकाकार, कलाभिज्ञ वगैरे प्रकारचे लोक होऊन गेले. यावरून या कालाचें महत्व वाचकांच्या लक्षांत येईल. राजकीय, सामाजिक, औद्योगिक, धार्मिक वगैरे सर्व बाबतींत ह्या कालांत झपाट्यानें प्रगति झाली. वरील सर्व बाबतींत त्या कालीं प्रमाणभूत ह्मणून ज्या गोष्टी ठरल्या त्या अद्यापही तशाच मानल्या जात आहेत. **वंग अनूशी** नामक प्रख्यात राजकीय सुधारक ह्याच काळांत होऊन गेला. त्याचा जन्म इ. स. १०२१ त झाला. तरुणपणींच त्याच्या लेखणीचें महत्व फार वाढलें व पुढें तो मोठा अधिकारी बनला. तो ४८ वर्षांचा झाल्यावर बादशहाचा विश्वासुक सल्लागार बनला. त्यानंतर त्यानें अनेक महत्वाच्या राजकीय सुधारणा घडवून आणल्या. लोकांवरचा कर कमी करून उत्पन्न वाढविण्याची युक्ती त्यानें पुढील योजनेच्या द्वारें काढली:—

(१) विवक्षित जिल्ह्यांत जें पीक येईल त्यापैकीं ठराविक भाग सरकारसाऱ्याकरितां निराळा काढून ठेवावयाचा. (२) लोकांच्या गरजा भागविण्याकरितां जरूर असलेला आणखी एक भाग वेगळा काढून ठेवावयाचा. (३) नंतर राहिलेलें धान्य सरकारनें उक्तें विकत घ्यावयाचें व जेथें पीक झालें नसेल तेथें नेऊन व्यापारी भावानें विकावयाचें. (४) शेतकऱ्यांना त्यांच्या पिकाच्या अदमासानें आगाऊ रकमा द्यावयाच्या. या योजनेमुळें शेतकऱ्यांची सोय होऊन सरकारचाही फायदा होऊं लागला. राष्ट्राचें लष्करी सामर्थ्य वाढविण्या करितां यानें दुसरी एक अशी योजना केली होती कीं, ज्या घरांत दोन पुरुष असतील त्या घरानें एक पुरुष लष्करी नोकरीकरितां दिलाच पाहिजे; त्याचप्रमाणें सरकारच्या खर्चानें प्रत्येक कुटुंबानें एक लष्करी घोडा पाळलाच पाहिजे; असे निर्बंध त्यानें घालून दिले. जमिनीची पुन्हां मोजणी व फेरतपासणी करून जमाबंदीची योग्य सुधारणाही ह्यानेंच प्रथम केली. यानें शिक्षणखात्यांतही उत्तम प्रकारच्या सुधारणा केल्या. याच्या पूर्वीच्या कालीं शिक्षणाचा भर मुख्यतः भाषाशास्त्र व साहित्य—अलंकारशास्त्र—यांवर विशेष असे. यानें तो प्रकार मोडून इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र हे विषय आवश्यक केले. वनस्पतिशास्त्र, वैद्यशास्त्र, कृषिशास्त्र, हस्तकौशल्य इत्यादि गोष्टींसही त्यानें उत्तेजन दिलें. परंतु त्याच्या ह्या सर्व सुधारणा मान्य होण्यासारखी त्या वेळीं तेथील समाजाची स्थिति नव्हती. समाज त्याच्याहून विचाराच्या बाबतींत पुष्कळसा मागें होता. त्याच्या उत्तर वयांत तो अप्रिय होऊन दरबारचीही त्याजवर

खप्पा मर्जी झाली. पुढें त्यानें नोकरी सोडून दिली; तेव्हां त्यानें केलेल्या कित्येक सुधारणा रद्द करण्यांत आल्या. पण त्याचें धोरण पुढें **चू-शी** नामक मुत्सद्यानें यशस्वी केलें. हा मुत्सद्दी इ० स० ११३० पासून १२०० पर्यंतच्या कालांत होऊन गेला. यानें कन्फुशियसच्या ग्रंथावर उत्तम प्रकारचें भाष्य केलेलें आहे. त्या ग्रंथाचा प्रवृत्तिपर अर्थ करणारा असा हा पहिलाच ग्रंथकार होय.

हा मोठा धोरणी व राजकार्यकुशल होता. चीनमध्यें प्रवृत्तीमार्गाचें प्राबल्य ह्यानेंच सुरू केलें व तेव्हांपासून आजतागायत तें सारखें वाढत आहे. हा मरेपर्यंत एकसारखा लोकप्रिय होत गेल्यानें मरणानंतरही त्याच्यासंबंधानें लोकांच्या मनांत अत्यंत पूज्यभाव उत्पन्न झाला होता याच्यासंबंधानें अशी एक आख्यायिका आहे कीं, त्याचें शव जेव्हां पेटीमध्यें घातलें तेव्हां ती पेटी आपोआप जमिनीपासून तीन फूट उंच हवेंत तरंगत राहिली. पुढें जेव्हां त्याच्या जांवयानें त्याच्या आत्म्याची प्रार्थना करून त्यास त्यानें जिवंतपणीं प्रतिपादिलेल्या थोर व उदात्त मतांची स्मृति करून दिली तेव्हां ती पेटी पुन्हां आपोआप खालीं आली ! **सूंग** राजघराण्याच्या अमदानींत चीनमध्यें देशाभिमानी लोकही पुष्कळ निपजले. त्या घराण्यावर जेव्हां संकटें आलीं व चीन देश परकीयांच्या ताब्यांत जाण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं तेव्हां अनेक देशभक्तांनीं सूंग घराण्याच्या वतीनें लढून, नानाप्रकारच्या आपत्ति भोगून व प्रसंगीं प्राण अर्पण करूनही आपली देशभक्ती गाजविली आहे ! तथापि अखेरीस त्यांच्या दुर्दैवानें उचल खाऊन **सूंग** घराण्याचा विध्वंस झाला व चीनवर मोंगोल लोकांची सत्ता स्थापन झाली ह्या लोकांनीं इ० स० १२६० पासून १३६८ पर्यंत चीनवर सत्ता गाजविली. या मोंगोल घराण्यांत **कावुलीखान** नामक बादशहा मोठा पराक्रमी व कर्ता पुरुष होऊन गेला. त्याचें वैभव फार मोठें होतें. त्यानें कोरिया, बर्मा व अनाम हे देश पादाक्रांत करून त्यांस चीनचे मांडलिक बनविलें होतें. त्यानें जपानवरही जलमार्गानें मोठ्या जय्यत तयारीनें स्वारी केली. पण इंग्लंडवर स्वारी करणाऱ्या धाडसी **स्पॅनिश आरमेडा**ची–आरमाराची जशी धुळधाण उडाली तशीच अवस्था ह्या स्वारीचीही झाली. ह्या मोंगोल घराण्याच्या कारकीर्दीत **मोंगोल व मँचु** या भाषांचा प्रचार चीनमध्यें सुरू झाला. कावुलीखानानें चिनी पंचांगाची सुधारणा केली व बादशाही विश्वविद्यालयाची

स्थापना केली. त्यानें सरकारी बँकेच्या नोटा प्रचलित केल्या व यलो नदीचें पात्र उगमाजवळ खणून रुंद व खोल केलें. काबुलीखान स्वतः बुद्धधर्मीय होता. तथापि कन्फुशियसचा सत्कार करण्यास तो चुकत नसे. तथापि **टाई** नामक धर्मपंथाचा त्यानें छल केल्यामुळें व लोकांवर करांच्या बाबतींत असह्य जुलूम केल्यामुळें त्याची प्रजा असंतुष्ट झाली. काबुलीखानाच्या अंगचें सामर्थ्य त्याच्या वंशजांत राहिलें नाहीं. या संधीचा फायदा घेऊन चिनी लोकांनीं त्याच्या नातवाच्या कारकीर्दीत ( इ० स० १३६० ते ६८ ) बंड केलें. लोकमत शांत करण्याचा ह्या नातवानें बराच प्रयत्न केला. पण त्याचा कांहींएक उपयोग न होतां अखेरीस बंडवाल्यांच्या पुढाऱ्यांनीं ह्या घराण्याचा विध्वंस करून त्यांपैकीं एकानें आपणास बादशहा ह्मणवून चीनची गादी बळकाविली.

हा पुढारी **मिंग्ज** नामक चिनी घराण्यांतीलच असल्यामुळें लोकांनींही त्यास प्रोत्साहनच दिलें. याचें नांव **चू युयानचंग** असें होतें. त्याच्या वयाच्या १७ व्या वर्षीं त्याचे आईबाप वारल्यानें त्यानें बुद्ध भिक्षूची दीक्षा घेतली. पुढें देशांत बंडाळी माजल्यावर तो लष्करांत शिरला व आपल्या अंगच्या हुषारीनें वाढतां वाढतां एका मोठ्या सैन्याचा सेनापति बनला. इ० स० १३६८ त त्यानें मोंगोल राजघराण्यापासून अनेक चिनी प्रांत हिरावून घेतले व त्यानंतर लवकरच त्यानें आपल्या नांवाची द्वाही फिरविली. बादशहा झाल्यावर त्यानें **हूंग वू** हें नांव धारण केलें आणि **नांकिंग** शहर आपली राजधानी केली. तो चांगला मुत्सद्दीही होता. तसेंच शिक्षण व वाङ्मय यांसही त्यानें उदार आश्रय देऊन उत्तेजन दिलें होतें. चीनमध्यें सर्वांत उच्च परीक्षा घेण्याची परवांपर्यंत जी पद्धत चालू होती-जिच्यांत हल्लीं आणखी सुधारणा झाली आहे-ती यानेंच सुरू केली. ह्यानें चिनी स्वदेशी पोषाख सुरू केला, पिनल कोड व वसुलपद्धति यांत प्रगतिपर सुधारणा केल्या, नोटा व नाणें यांचा योग्य पुरवठा व प्रसार केला आणि हिजड्यांना अधिकाराच्या जागा देण्याची पद्धत मोडून टाकिली. **बुद्ध** धर्म व **टाई** धर्म हे दोन्ही राष्ट्रीय धर्म मानण्याचें ह्यानें सुरू केलें. हा थोर बादशहा इ० स० १३९८ त वारला.

ह्याच्यामागून ह्याचा नातू गादीवर बसला. यानें गादीवर येतांच आपल्या चुलत्यांशीं वैर मांडलें. तेव्हां त्यांपैकीं एकानें सैन्य जमवून ह्याजवर

स्वारी केली. त्यांत ह्याचा पराभव होऊन ह्यास पळून जावें लागलें. पुढें हा वेष पालटून पेकिंग येथें जाऊन राहिला व तेथें ४० वर्षांनंतर मरण पावला असें सांगतात.

त्याचा विजयी चुलता इ० स० १४०३ मध्यें गादीवर बसला. त्या वेळीं त्यानें **यूंग लौ** हें उपपद धारण केलें. तो मोठा योद्धा व मुत्सद्दी होता. त्यानेंच **पेकिंग** शहर बांधून तेथें आपली राजधानी केली. त्या वेळेपासून अद्यापपर्यंत चीनची राजधानी ह्याच ठिकाणीं आहे. यानें नवीन पिनल कोड तयार केलें. तसेंच तार्तर लोकांवर स्वाऱ्या करून त्यांचा मोड केला. जावा, सुमात्रा व सयाम येथें आपले वकील पाठवून त्या देशांशीं व्यवहार सुरू केला. हा विद्येचा मोठा भक्त होता. यानें सुमारें २००० विद्वान् लोकांस पदरीं ठेवून त्यांच्याकडून एक विश्वकोश तयार करविला. ह्या कोशाचें काम ५ वर्षें-पर्यंत चालू होतें. त्यांत ( १ ) कन्फ्युशियसचे ग्रंथ ( २ ) इतिहास ( ३ ) तत्वज्ञान आणि ( ४ ) सर्वसाधारण वाङ्मय,-यांत जोतिषशास्त्र, भूगोल, सृष्टिशास्त्र, वैद्यक, धर्मशास्त्र, बुद्ध धर्म, टोई धर्म, शिल्पशास्त्र, ललितकला इत्यादींचा समावेश केला होता—इतक्या मुख्य सदरांखालीं त्या त्या बाबी-संबंधीं उपलब्ध असलेली सर्व माहिती देण्यांत आली होती. त्याचे सुमारें ११,००० भाग तयार झाले होते व त्यांत २२,८७७ प्रकरणें होतीं. प्रत्येक प्रकरणाकरितां सुमारें २० पृष्ठें खर्ची पडलीं होतीं. त्याची एकंदर पृष्ठसंख्या ९,१७,४८० पृष्ठें असून शब्दसंख्या ३६,६०,००,००० इतकी होती. प्रत्येक पृष्ठाचा आकार एक फूट आठ इंच लांब व एक फूट रुंद होता. हा ग्रंथ केवढा मोठा व भव्य होता याची कल्पना येण्याकरितां एवढें सांगितलें ह्मणजे पुरे कीं, त्याच्यापुढें Encyclopedia Britanica हा जगन्मान्य ग्रंथही फिका पडेल ! हा विस्तृत विश्वकोश छापण्याचा योग कधींही आला नाहीं. वरील बादशहानें त्याच्या तीन प्रति करविल्या होत्या. पैकीं दोन प्रतींचा नाश ह्या घराण्याच्या नाशाबरोबरच इ० स० १६४४ त झाला. तिसरी प्रत पेकींगमध्यें होती. तिचाही इ० स० १९०० च्या वेढ्यांत अंशतः नाश झाला आहे. हल्लीं या ग्रंथाचे मधले मधले कांहीं भाग उपलब्ध आहेत. या ग्रंथाची अशाप्रकारें वाताहत झालेली पाहून, 'कालाय तस्मै नमः' असे उद्गार कोणाच्या तोंडून निघणार नाहींत ? विश्वकोश तयार करविणारा

बादशहा बुद्धधर्माचा उत्कट अनुयायी होता व त्यानें बुद्धधर्मीय लोकांस मोठमोठ्या अधिकाराच्या जागा दिल्या होत्या. त्याच्या आश्रयावर पेकींगमध्यें दहा हजार बुद्ध भिक्षु जगत होते. ह्या **मिंग** घराण्याच्या कारकीर्दीतच पुढें चित्रकलेचा अत्यंत उत्कर्ष झाला. या वेळीं प्रख्यात असे सुमारें २०० चितारी होऊन गेले. त्यांखेरीज सामान्य प्रतीचे होते ते निराळेच. यांचेच अमदानींत युरोपियन राष्ट्रांतील लोक व मिशनरी यांचा चीन देशांत चंचुप्रवेश झाला.

ह्या घराण्याचाही पुढें कालवशात् नाश होऊन चीनची राजसत्ता नुकत्याच नष्ट झालेल्या **मँचू** घराण्याकडे आली. यासच **चिंग** घराणें असें ह्मणतात. या घराण्यांत एकंदर ९ बादशहा व एक बादशाहीण ( Dowager Empress ) झाली. पैकीं बादशाहीण ' **डाउगर एंप्रेस** ' या नावानें प्रसिद्ध असून तिची कारकीर्द सामान्यतः इकडील वर्तमानपत्रांच्या वाचकांस माहित आहेच. जे नऊ बादशहा झाले, त्यांपैकीं विशेष महत्वाचे असे दोनच होते. पैकीं एकाचें नांव **खंगशी** असें असून तो इ० स० १६६२ पासून राज्य करूं लागला व ६० वर्षेपर्यंत गादीवर होता. हा बादशहाही वाङ्मयाचा मोठा भक्त होता. यानें स्वतःच्या नजरेखालीं चिनी भाषेचा एक बराच चांगला कोश तयार करविला. त्यांत सुमारें ४०।४५ हजार शब्द आहेत. प्रत्येक शब्दाबरोबर त्याचा उपयोग कोठें कसा करण्याचा प्रघात आहे हें दर्शविण्याकरितां गतकालीन व वर्तमानकालीन ग्रंथांतून अभियुक्त अवतरणें, सुभाषितें वगैरेंचाही संग्रह ह्या कोशांत केलेला आहे. या कोशाखेरीज यानें एक विश्वकोशही तयार करविला. हा विश्वकोश मागें उल्लेखिलेल्या विश्वकोशापेक्षां लहान आहे; परंतु बराच महत्वाचा आहे. २०० पृष्ठांचा एक याप्रमाणें त्याचे १६२८ भाग आहेत. त्यांत निरनिराळ्या विषयासंबंधानें जुनी व नवी–उपलब्ध असलेली सर्व–माहिती दिलेली आहे. त्यांतील चरित्रांच्या शाखेत सुमारें ३० हजार थोर पुरुष व २४ हजार प्रसिद्ध स्त्रिया यांचीं त्रोटक चरित्रें आहेत. या एकाच गोष्टीवरून या कोशाचें महत्व वाचकांच्या लक्षांत येईल. त्यांत जागोजाग चित्रेंही दिलीं आहेत. याची एक छापील आवृत्ति २०।२५ वर्षांपूर्वीं निघालेली होती.

या घराण्यांतील नांव घेण्यासारखा दुसरा बादशहा **चेन्लुंग** हा होय.

हा इ० स० १७३५ त गादीवर आला व ६० वर्षें राज्य केल्यानंतर स्वहस्तानें मुलास गादीवर बसवून इ० स० १७९९ त वारला. तो आजानुबाहु होता असें ह्मणतात. तो चांगला मुत्सद्दी व राजकार्यकुशल होता; तसेंच विद्येचाही तो चांगला चहाता होता. तो स्वतः कवि होता. स्वतःच्या कविता त्याला फार आवडत असत. त्याला ख्रिस्ती मिशनरी आवडत नव्हते व त्यानें आपल्या राज्यांत ख्रिस्ती धर्माचा उपदेश करण्याची मनाई केली होती. त्याच्या दरबारीं अनेक पंडित व निरनिराळ्या शास्त्रांत प्राविण्य संपादन केलेले विद्वान् लोक होते. त्यास गादीवर येऊन १० वर्षें होतात न होतात तोंच त्याला मोठमोठ्या युद्धांत पडावें लागलें. ह्या सर्व युद्धांत त्यानें एकसारखे विजय मिळविले. त्याच्या सेनापतीनीं नेपाळांत आपलें सैन्य नेऊन तेथील गुरख्यांस जिंकलें. ब्रिटिश हद्दीपासून सुमारें ६० मैलांपलीकडच्या सर्व टापूंत त्यानें आपला अंमल बसविला होता. ब्रह्मदेशाकडूनही त्यानें खंडणी घेतली. **तिबेट, कुज्ला** आणि **काशगेरिया** या प्रांतांतही त्यानें आपलें वर्चस्व स्थापन केलें. फोर्मोसा व इतरत्र झालेलीं बंडें त्यानें मोडून टाकिलीं. याचे अमदानींत सुमारें ५० वर्षांत चीनची लोकसंख्या दुपटीनें वाढली आणि सर्व देशाची एकंदरींत भरभराटच होत गेली. पोर्चुगीज, डच व इंग्रज राष्ट्रांचे वकील याच्याच कारकीर्दींत चिनी दरबारीं येऊं लागले. यांचें त्या देशांतील वास्तव्य इ० स० १७५० नंतर सुरू झालेलें आहे. याप्रमाणें चीन देशांतील दोन हजार वर्षांतील राजपुरुषांचा व त्यांच्या घराण्यांचा त्रोटक इतिहास आहे.

---

## लेखांक ४ था.

# खेळ व करमणुकीचे प्रकार.

**चिनी** लोक खेळाचे मोठे भोक्ते आहेत. कसरती, मर्दानी खेळ, शिकार वगैरे प्रकार ख्रिस्ती शकापूर्वीपासून चीनमध्यें प्रचारांत आहेत. इंग्रज लोकांत **हॉकी** नामक जो खेळ आहे तशा प्रकारचा खेळ चीनमध्यें ख्रिस्ती शकापूर्वी एक शतकापासून चालू असल्याबद्दल लेखी पुरावा सांपडलेला आहे. सांप्रत त्या देशाच्या उत्तर भागांत हा खेळ विशेष प्रचलित आहे. प्राचीन काळीं तीरकमठे व बाण यांच्या साह्यानें शिकार करीत असत. अलीकडे बऱ्याच वर्षांपासून ह्या कामीं बंदुकीचा उपयोग होऊं लागला आहे. बैलांची व रेड्यांची टक्कर, हा खेळही प्राचीन काळीं चीनमध्यें सुरू होता. अलीकडे तो बंद झालेला आहे. ठोसाठोसी ( Boxing ) कुस्त्या, पट्टा खेळणें वगैरे प्रकारही प्राचीन काळीं तेथें अस्तित्वांत होते. जपानांतील आधुनिक **जिउ-जित्सु** नामक खेळ चिनांतील एका तत्सदृश खेळावरूनच निघालेला आहे. ( Boxing ) नामक मर्दानी खेळासंबंधीं चिनी भाषेंत एक सुंदर पुस्तक लिहिलेलें आहे. त्यामध्यें या खेळाच्या खुबीसंबंधानें पुढील वर्णन आहेः—

“ सर्व शरीराची हालचाल अगदीं चपलतेनें करतां आली पाहिजे. हात व पाय यांची क्रिया इतक्या चपलतेनें व दक्षतेनें चालविली पाहिजे कीं, प्रतिपक्षाच्या सूक्ष्म दिरंगाईचाही सहज फायदा घेतां येऊन हवें तेव्हां पुढें अगर मागें सहज जातां यावें. प्रतिपक्षावर हल्ला करितांनां पायांची हालचाल करण्यांत या खेळाचें खरें कौशल्य–रहस्य–आहे; प्रतिपक्षाला खालीं लोळ-विण्यांत त्याचा ( खेळाचा ) जोमदारपणा आहे, मुठीनें तडक–समोरासमोर–ठोसा लगावण्यांत त्याचें चापल्य आहे आणि प्रतिपक्षाला त्याचें तोंड वर करून स्तब्धपणें दाबून धरण्यांत त्याची सफाई आहे. ”

फुटबॉल व पोलो हे खेळही अनुक्रमें ख्रिस्ती शकाच्या ५ व्या व ८ व्या शतकापासून चीनमध्यें सुरू झाले. पोलोचा खेळ बायका देखील खेळत असत. हा खेळ चिनी लोकांनीं तार्तर किंवा इराणी लोकांपासून उचलला असावा असा तज्ञांचा तर्क आहे. पतंग उडविण्यांत तर चिनी लोकांइतके दुसरे कोणतेही लोक कुशल नाहींत. हे पतंग चित्रविचित्र रंगाचे व कांहीं तर फटाक्यांचे डबे हवेंत उड-

विणारे असे असतात. हे डबे उडविण्याचें काम कधीं कधीं पाळीव पक्ष्यांकडून करण्यांत येतें. हे पक्षी पतंग उंच गेल्यावर वर जाऊन फटाकड्यांच्या डब्यास चोंचीनें अग्नि लावितात. त्यासरशीं भराभर बार सुरू होतात. चीनमध्यें जुगाराचें प्राबल्य विशेष आहे. लहान पोरापासून तों बादशहापर्यंत सर्व लोक मर्जीप्रमाणें यथेच्छ जुगार खेळतात. मजूर लोक तर रोजच्या मधल्या सुटींत देखील पत्त्यांच्या साह्यानें जुगार खेळतात. हे पत्ते ( cards )इ० स० च्या दहाव्या शतकांत राजवाड्यांतील एका स्त्रीनें केलेल्या नमुन्याबरहुकूम तयार केलेले असतात. युरोपियन राष्ट्रांत सुरू असलेले पत्ते बहुधा या पत्त्यांवरूनच तयार झाले असावेत अशी कित्येकांची समजूत आहे. बुद्धिबळाच्या खेळांतही पैसे लावून खेळण्याची लालूच तेथील लोकांस लागलेली आहे. ह्या जुगारामुळें पुष्कळ कुटुंबें भिकेस लागलीं आहेत व लागत आहेत. चिनी लोकांचा हा राष्ट्रीय दुर्गुण आहे. परंतु प्रस्तुतचा चिनी अध्यक्ष **युयानशिकाई** याचें त्याकडे लक्ष गेलें असून तो नाहींसा करण्याविषयींचे त्याचे प्रयत्न चालू आहेत.

चीन देशांतील मुख्य करमणुकीचा प्रकार 'नाटक' हा आहे. हीं नाटकें बहुधा जुन्या ऐतिहासिक प्रसंगांवर रचलेलीं असतात. नाटकांतून व अखेरीस कधीं कधीं छोटेखानी फार्सही करण्यांत येतात. चिनी लोकांना हंसविणें फार कठीण आहे. अत्यंत कुशल नट असल्यावांचून प्रेक्षकगणांच्या चेहऱ्यावर हास्यरसाची छटा कधींही उमटत नाहीं. यावरून चिनी नट व नाट्यकला हीं बरींच श्रेष्ठ दर्जाचीं असलीं पाहिजेत हें उघड आहे. चिनी नट तयार करणें व रंगभूमीवर त्याचें काम पसंत ठरणें ह्या दोन्ही गोष्टी फार कठीण असून त्यांप्रीत्यर्थ अत्यंत परिश्रम करावे लागतात. इ० स० १७३६ पूर्वी चीनमध्यें स्त्रिया नटाचें काम करीत असत. परंतु **चेनलूंग** नामक बादशहानें ( त्याची आई नटाचें काम करीत असे. ) ही चाल बंद केली. तेव्हांपासून पुरुषवर्गासच नाटकांत स्त्रियांचीं कामें करावीं लागतात. पुरुष हीं कामें स्त्रियांप्रमाणें अगदीं बेमालुम करितात. सूक्ष्म अवलोकन करणारांसही रंगभूमीवरील स्त्रीपात्र पुरुष आहे कीं स्त्री आहे हें ओळखतां येणार नाहीं. पाश्चात्य राष्ट्रांतील नटापेक्षां चिनी नटाचा धंदा फार कठीण आहे. पाश्चात्य रंगभूमि निरनिराळ्या देखाव्यांनीं श्रृंगारलेली असते. चिनी रंगभूमीवर हे सर्व देखावे नटानें आपल्या अभिनयकौशल्यानें प्रेक्षकांच्या डोळ्यांसमोर

उभे करावे लागतात. बंगाल्यांतील प्रख्यात कवि रवींद्रनाथ टागोर यांचे मतें खरें कौशल्य वरील पद्धतींतच आहे. त्यांना पाश्चात्य राष्ट्रांतील सीनासिनरीची (देखाव्यांची) पद्धत पसंत नाहीं. अर्थात्, त्यांच्यासारख्यांच्या दृष्टीनें चिनी नट व चिनी रंगभूमि हीं अधिक श्रेष्ठ ठरणार हें उघड आहे. अशाच प्रकारची पद्धत इंग्लंडमध्यें इलिझाबेथ राणीच्या वेळीं होती व आमच्याकडेही कांहीं दिवसांपूर्वी किर्लोस्कर व शाहुनगरवासी मंडळींच्या नाटकांत होती. ह्या दोन्ही मंडळींतील नट आपापल्या कामांत पुष्कळ कुशल असल्याकारणानें देखाव्यांच्या अभावामुळें नाटकप्रयोगास कधींही कमीपणा येत नसे, हें इकडील पुष्कळ नाट्यकलालोलुप मंडळीस ठाऊक असेलच. हीच स्थिति सध्यां चीनमध्यें आहे. चिनी रंगभूमीचे कांहीं ठळक दोष असे आहेतः— (१) तेथें पडदे नसतात. (२) पडदे, खुर्च्या, टेबलें, चहाचे पेले वगैरे सामान प्रेक्षकांदेखत व खेळ चालू असतां वेळोवेळीं—जरूर पडेल तेव्हां-एका नोकराकडून रंगभूमीवर आणतात. (३) एखादा नट मृताच्या वेषांत जरी असला तरी आपलें काम आटोपतांच **स्वतः उठून** निघून जातो. (४) प्रत्येक अंकानंतर विश्रांति घेण्यांत येत नाहीं, त्यामुळें खेळ लांबलचक वाटून कंटाळा येतो; वगैरे.

लहान मुलें व गरीब लोक यांच्या करमणुकीकरितां ललितवजा खेळ व देखावे चीनमध्यें नेहमीं-बहुधा प्रत्येक शहरांत होत असतात. अशा प्रकारचे खेळ ख्रिस्तीशकापूर्वी सुमारें ७०० वर्षांपासून तेथें चालू आहेत. प्रांतिक लष्करी अगर अन्य थोर पुरुषांचीं चरित्रें व धार्मिक समजुती हीं ह्या खेळांचे विषय असतात. इकडील गारुडी, डोंबारी यांच्या खेळासारखे खेळही तिकडे पुष्कळ प्रकारचे आहेत व ते नित्य चालू असतात. ह्यांशिवाय सार्वजनिक ठिकाणीं गोष्टी सांगून लोकांची करमणुक करण्याचा प्रकारही तिकडे विशेष प्रचारांत आहे. ह्या गोष्टी नैतिक असून शौर्य, धैर्य व साहसादि गुणांनीं भरलेल्या असतात.

भूतचेष्टा, चेटक्या व त्यांच्या लीला या गोष्टींचीही तेथें रेलचेल आहे. भूतांसंबंधीं हजारों गोष्टी प्रचलित असून त्या एक करमणुकीचें साधन बनल्या आहेत.

नियतकालिक मेजवान्या हा एक चिनी लोकांच्या करमणुकीचा विशेष प्रकार आहे. चीनमध्यें आठवड्यांतून एक दिवस विश्रांति घेण्याची पद्धत नाहीं.* वर्षांतून सणाचे ह्मणून कांहीं दिवस ठरलेले आहेत. त्या दिवशीं बरेच व्यापारी व मजूर विश्रांति घेतात; परंतु सर्वच घेतात असें नाहीं. नवीन वर्ष सुरू होण्याचे वेळीं मात्र अगोदर १० दिवस व मागाहून २० दिवस सर्वांनीं विश्रांति घेतलीच पाहिजे, असा नियम आहे. ह्या कालांत सर्व सरकारी कचेऱ्या बंद असतात व त्या वेळीं अधिकाऱ्यांनीं कांहीं काम करूं नये ह्मणून त्यांच्या अधिकाराचे शिक्के त्यांच्या स्त्रियांच्या स्वाधीन करण्याची चाल पडलेली आहे. व्यापारी लोकांनीं आपले सर्व हिशेब सुटी सुरू होण्यापूर्वी संपविले पाहिजेत, असा शिरस्ता आहे. त्यापूर्वी कांहीं दिवस प्राणीमात्रांनां मिठाई अर्पण करण्याची चाल आहे. हेतु हा कीं, त्यायोगें पुढील वर्ष चांगलें जावें. ह्या मोठ्या सुटींत जिकडे तिकडे आनंदीआनंद होऊन दारूकाम सोडण्यांत येतें. मित्र, आप्त, अधिकारी, राजा व प्रजा हीं एकमेकांस बक्षिसें देतात, मेजवान्या करितात व नाच तमाशे, नाटकें, गाणीं इत्यादि प्रकारांनीं आपली करमणुक करितात. ह्या दिवसांत मलिन वस्त्र कोणाच्याही अंगावर नसतें. भिकाऱ्यांनां सुद्धां नवीं वस्त्रें मिळतात. या वेळचे श्रीमंत व सरदार लोकांचे पोषाख अत्यंत प्रेक्षणीय असतात. सर्व लोक एकमेकांस नमस्कार करून लक्ष्मीवंत होण्याचा आशिर्वाद देतात. चिनी नवें वर्ष ऊर्फ पाडवा ता० २१ जानेवारीपासून २० फेब्रुवारीच्या दरम्यान केव्हां तरी येतो. आणि त्या वेळीं चीन देशांत जो कोणी परका मनुष्य जाईल त्यास जिकडे तिकडे उत्सव व आनंदी आनंद दिसून येईल. पिंवळ्या, निळ्या, जांभळ्या व लाल रेशमी रंगांच्या झग्यांनीं विभूषित झालेले श्रीमान् व सरदार लोक, राजघराण्यांतील पुरुष, व शुभ्र रेशमी कपडे घातलेले सामान्य लोक हे रस्त्यामध्यें एकमेकांस प्रेमानें भेटून परस्परांस कल्याणप्रद आशिर्वाद देत असलेले पाहून कोणाचें हृदय उचंबळून येणार नाहीं? कांहीं वर्षांपूर्वी सीमोल्लंघनाचे वेळीं महाराष्ट्रांत हा प्रेक्षणीय व आनंदाश्रु उत्पन्न

* अलीकडे युरोपियन व्यापाऱ्यांच्या सहवासानें कित्येक चिनी व्यापारी रविवारीं विश्रांति घेऊं लागले आहेत. पण अद्याप तसा प्रघात देशांत सर्वत्र पडलेला नाहीं.

करणारा देखावा पहावयास मिळत असे; परंतु आमच्या दुर्भाग्यानें दिवसानुदिवस तो संपुष्टांत येत चालला आहे! असो. या सुटीच्या कालांत चिनी राष्ट्रांतील प्रत्येक शहरांतील व खेड्यांतील लोकांचीं संमेलनें होऊन त्यांनां एकमेकांचीं मनें रिझविण्याची संधि मिळते. आणि त्या कारणानें परस्परांची परस्परांस विशेष माहिती होऊन राष्ट्रीय ऐक्यसंवर्धनास मदत होते.

नियतकालिक मेजवान्यांचा मागें जो प्रकार सांगितला तो सणावाराचे दिवशीं अगर कांहीं नैमित्तिक कारणानें जुळून येत असतो. ह्या प्रसंगीं स्नेही, आप्तइष्ट व इतर कांहीं विशिष्ट पाहुणे येवढ्यांनांच निमंत्रण करण्यांत येतें. त्यांत कांहीं स्त्रियाही असूं शकतात. ही मेजवानी कांहीं अंशीं युरोपियन मेजवानीच्या धर्तीवर होत असते. मेजवानीच्या प्रसंगीं करमणुकीकरितां गायन व वादनही कोठें कोठें सुरू असतें.

वनभोजन व क्षेत्र[1]भोजन हे प्रकारही चीन देशांत आहेत. वनभोजनाचा प्रकार आमचेकडे आहेच व त्याबद्दल विशेष लिहिण्याचें कांहीं कारण नाहीं. परंतु क्षेत्रभोजनासंबंधानें थोडा खुलासा करणें जरूर आहे. क्षेत्रभोजनाचा प्रकार असा आहे कीं, एखादें गांव, देवालय, पर्वत, अरण्य, गुहा वगैरे कोणतें तरी एखादें स्थान पाहण्यास जाण्याचा एखाद्या शहरांतील अगर गांवांतील कांहीं लोकांनीं विचार केला म्हणजे ते त्या कार्याप्रीत्यर्थ वर्गणी जमवितात. जितके लोक वर्गणी देतील त्या सर्वांचा एक कंपू बनतो. आणि मग ठराविक दिवशीं हे सर्व लोक त्या ठिकाणीं जातात. तेथें गेल्यावर एक अगर दोन दिवस राहून, तेथील स्थान पाहणें, पोहणें, अन्य तऱ्हेची क्रीडा करणें व सहभोजन इत्यादि गोष्टी ते तेथें करितात. हा योग जुळवून आणण्याकरितां ठिकठिकाणीं मुद्दाम कांहीं विशिष्ट संस्था ( Societies ) स्थापन झालेल्या आहेत. क्षेत्रभोजनाचा हा खरा प्रकार झाला. याप्रमाणेंच लुटुपटीचा–खोटाही–एक प्रकार आहे. त्यांत वर्गणी जमविणें व जेवण करणें ह्या दोन गोष्टी मात्र खऱ्या असतात. क्षेत्रप्रयाणाचा बेत मात्र गाळलेला असतो. हें जेवण एखाद्याच्या घरीं अगर एखाद्या मोठ्या बगिच्यांत करितात.

१ येथें 'क्षेत्र' हा शब्द सामान्यतः 'स्थान' ह्या अर्थानें योजला आहे.

चिनी लोकांत भुतांखेतांवर विश्वास ठेवणारे लोक फार आहेत ह्मणून मागें सांगितलेंच आहे. खालच्या दर्जाच्या लोकांत ह्या भुतांखेतांसंबंधीं अनेक प्रकारचे खेळ व तमाशे चालू असतात. तसेंच अंगांतील भूत काढण्याचे तिकडे जे प्रकार आहेत ते मुळचे जरी गंभीर स्वरूपाचे असले तरी सांप्रत त्यांना पुष्कळ अंशीं करमणुकीचेंच स्वरूप प्राप्त होत चाललें आहे. चिनी लोक पक्ष्यांचे फार भोक्ते असून त्यांच्याकडून निरनिराळे खेळ व चेष्टा करवून ते आपली करमणूक करून घेत असतात. याप्रमाणें चिनी लोकांच्या खेळांची व करमणुकीच्या प्रकारांची सामान्य माहिती आहे.

## लेखांक ५ वा.

# विशिष्ट स्वभाव, मनोवृत्ति व चालीरीति.

१. राजाला निर्भिडपणें योग्य असेल ती सल्लामसलत देणें हें आपलें पवित्र कर्तव्य आहे, असें चिनी मुत्सद्दी मानतात व त्याप्रमाणें अनेक मुत्सद्दी आजपर्यंत राजाची वक्रदृष्टि झाली असतांही वागलेले आहेत. वाटेल तें संकट आलें, प्राण जाण्याची जरी वेळ आली तरी योग्य ती सल्ला देण्याचें कर्तव्य बजावण्याचा निर्धार आजपर्यंत पुष्कळ मुत्सद्यांनीं पाळलेला आहे. मुत्सद्दी लोकांचें खरें कर्तव्य हेंच असल्याबद्दल चिनी राजपुरुषांनींही कबुली दिली असून सरकारच्या धोरणासंबंधानें बरा वाईट पण स्पष्ट अभिप्राय देण्याकरितां १४ व्या शतकापासून तेथें सरकारच्या संमतीनें एक '**दोषनिदर्शक मंडळ**' स्थापन करण्यांत आलें आहे. सरकारचें अगर सरकारी अधिकाऱ्यांचें जें सार्वजनिक कृत्य चुकीचें अगर दोषास्पद वाटेल त्यावर टीका करण्याचा अथवा त्याचा निषेध करण्याचा अधिकार ह्या मंडळास आहे. मात्र त्यानें आपली टीका खुद्द बादशहाकडे अर्जाच्या रूपानें पाठविली पाहिजे, असा नियम आहे. ह्या टीकेंत खुद्द बादशहाच्या कृत्याविरुद्ध जरी निषेधात्मक उद्गार असले तरी त्याबद्दल बादशहानें सदर मंडळावर रागावतां कामा नये अशी योजना आहे. परंतु कित्येक प्रसंगीं बादशहांनां आपला राग आवरून धरण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें ह्या मंडळांतील सभासदांस विषप्रयोग करून आत्महत्या करण्याची पाळी आलेली आहे! पण त्यांनीं कधींही त्याबद्दल फिकीर बाळगिली नाहीं.

२ जेव्हां एखाद्या श्रेष्ठ दर्जाच्या चिनी अधिकाऱ्यावर बादशहाची अवकृपा होऊन त्यास जबर शासन करण्याची पाळी येई, तेव्हां त्या अधिकाऱ्यानें विषप्रयोग करून घेण्याची इच्छा प्रदर्शित केल्यास त्याला तशा प्रकारची सवलत–परवानगी–बादशहाकडून मिळत असे.

३. चिनी लोक अमंगल किंवा शोकजनक प्रसंग स्पष्टपणें व्यक्त न करितां विशिष्ट प्रकारच्या सांकेतिक भाषेनें व्यक्त करितात. उदाहरणार्थ, कोणी विष खाऊन आत्महत्या केली तर त्यास ' त्यानें सोनें खाल्लें ' असें ते म्हणतात. ' बादशहा मेला ' असें त्यांच्यांत कधींच म्हणत नाहींत; तर ' बादशहा उच्चस्थानचा पाहुणा बनला आहे ' असें म्हणतात. तसेंच ' आई

बाप मेले ' याच्या ऐवजीं ' आईबाप नाहींत; ' एखादा अधिकारी मेल्यास ' तो पगार मिळवित नाहीं ' अगर ' तो जुनापुराणा झाला आहे; ' पेटींत घातलेल्या प्रेतास ' तें लांबच्या घरांत आहे; ' तें पुरल्यानंतर ' तें जुन्या कालांतील शहरांत आहे ' अथवा ' रात्रीच्या पोटांत आहे ' असें ह्मणण्याचा प्रघात* आहे.

४. भुतांखेतांसंबंधानें चिनी लोक इतके भित्रे असतात कीं, सामान्य चिनी मनुष्य रात्रीच्या वेळीं बिनरहदारीच्या ठिकाणीं सहसा जात नाहीं. एखाद्या पडक्या व ओसाड घरांत तो दिवसा देखील जाण्यास धजत नाहीं. भुतांखेतांसंबंधीं ज्या कमी अधीक भयंकर गोष्टी तिकडे प्रचलित आहेत त्यांचा तिकडील तरूण व धीट लोकांवरही विलक्षण परिणाम घडून त्यांच्या पोटांत भीति उत्पन्न होते. मासल्याकरितां दोन गोष्टी येथें देतों:—

" एकदां एक मनुष्य आपल्या उशाशीं दारूची बाटली–रात्रीं पिण्याकरितां–ठेऊन बिछान्यावर पडला. पुढें कांहीं वेळानें त्यानें जेव्हां त्या बाटलीकडे आपला हात नेला तेव्हां त्याला आपला हात धरून कोणी तरी आपणास जमिनींत ओढून नेत आहे असें वाटल्यावरून तो मोठ्यानें ओरडला. त्याचें ओरडणें चालू होतें व भूत त्याला जमिनींत गाडून त्याच्या उरावर माती लोटीत होतें; इतक्यांत आसपासची–शेजारची–मंडळी जागी होऊन तेथें आली व त्यांनीं त्याला सोडविलें. मंडळीचा जमाव पाहतांच भूत गुप्त झालें ! "

**गोष्ट दुसरी:—**

" एके दिवशीं रात्रीं ४ प्रवाशी एका खाणावळींत येऊन उतरले. ते ज्या खोलींत उतरले त्यांत त्या खाणावळवाल्याच्या सुनेचें प्रेत पेटींत घालून ठेविलें होतें. रात्रीं जेवण झाल्यावर त्या ४ प्रवाशांपैकीं तिघांस गाढ झोंप लागली व एक जागा होता. कांहीं वेळानें त्या पेटींतील स्त्री उठून उभी राहिल्याचा त्याला भास झाला. पुढें लवकरच ती स्त्री त्याच्या झोंपी गेलेल्या मित्रांजवळ येऊन त्यांस तिनें हुंगल्याचें त्याच्या दृष्टोत्पत्तीस आलें. नंतर ती जेव्हां त्याच्याजवळ आली तेव्हां घाईनें त्यानें आपली विजार चढवून दरवाजाकडे पोबारा केला व दार फोडून तो बाहेर पडला. त्या स्त्रीनें त्याचा

* आमच्याकडे ज्याप्रमाणें बांगड्या फुटल्यास ' बांगड्या वाढल्या ' व कुंकु सरल्यास ' कुंकु वाढलें ' असें ह्मणतात त्यांतलाच हा प्रकार दिसतो.

पाठलाग केला. रस्त्यांत त्या गृहस्थानें मोठमोठ्या आरोळ्या ठोकल्या पण त्याच्या मदतीस कोणीही धांवून आलें नाहीं. अखेरीस एका झाडापाशीं त्या स्त्रीरूपी भूतानें त्याला धरलें व लोळविलें आणि तें भूत त्या झाडावर जाऊन अदृश्य झालें. सकाळीं त्या मनुष्याचें प्रेत्र गांवांतील लोकांस आढळून आलें. इकडे त्याचे तिन्ही मित्रही त्या खाणावळींत मरण पावल्याचें दिसून आलें."

५. चिनी लोकांची रोजची राहणी व खाणेंपिणें अगदीं साधें असतें. ते अन्न बेतानेंच खातात पण चहा मात्र मुबलक पितात. मासे, कोंबडीं, बदकें, डुकराचें मांस, तांदूळ–भात–हें त्यांचें मुख्य खाद्य आहे. याखेरीज फ्रेंच लोकांनां जसे बेडूक विशेष प्रिय असतात त्याप्रमाणें त्यांनां एका जातीच्या छोटेखानी कुत्र्याचें मांस फार आवडतें. परंतु अलीकडे कुत्र्याचें मांस खाण्याचा प्रचार बंद होत चालला आहे. मांसाहारापेक्षां धान्याहार विशेष श्रेष्ठ अशी चिनी लोकांची समजूत असल्यामुळें पुष्कळ चिनी लोक तांदुळ व भाजीपाला यांवर निर्वाह करितात. आहारासंबंधानें चिनी तत्ववेत्यांनीं पुढील समजुती प्रचलीत केल्या आहेतः—"वनस्पत्याहार करणारे लोक बळकट–सशक्त होतात; मांसाहार करणारे शूर होतात; नुसत्या धान्यावर निर्वाह करणारे शहाणे निपजतात; आणि केवळ वायु भक्षण करून राहणारे ईश्वर बनतात!" चिनी लोकांची नेहमींची राहणी जरी अगदीं साधी असते तरी सणवारीं ज्या मेजवान्या होतात त्या बऱ्याच थाटाच्या असतात. त्या वेळीं दारू व निरनिराळीं स्वादिष्ट पक्वान्नें आणि फळफळावळ यांची गर्दी असते. त्या वेळीं गाणींही ह्मणण्याचा प्रघात आहे. येथें हें सांगणें जरूर आहे कीं, चिनी दारू विलायती दारूसारखी मादक नसते. ती तांदुळापासून काढलेली असून तिचे अनेक सौम्य प्रकार तयार करण्यांत येतात. ती ऊन–कढत–असतांनां घेण्याची वहिवाट आहे. तसेंच तिकडील दारूचे पेलेही युरोपांतील पेल्यांपेक्षां पुष्कळ लहान असतात. यामुळें ते थोडेसे कमजास्त झाल्यास त्यापासून दारू पिणारास फारसा त्रास होत नाहीं असें ह्मणतात. चीनमध्यें मागें एके वेळीं दारूचें महात्म्य बरेंच होतें; पण अलीकडे तें फारच कमी झालेलें आहे. पुष्कळ सभ्य गृहस्थांच्या मेजवान्यांत दारूचा गंध देखील नसतो. तसेंच दारू पिऊन कोणी रस्त्यावर अगर गटारांत पडल्याचीं उदाहरणेंही चीनमध्यें आढळून येत नाहींत. चिनी धर्मशास्त्रवेत्ते व नीतिशास्त्रवेत्ते यांनींही दारू वर्जच ठरविलेली आहे.

६. चिनी लोकांत एक गंमतीची चाल अशी आहे कीं, रस्त्यांतून जातांना जर एखाद्या मनुष्यास समोरून येणाऱ्या दुसऱ्या एखाद्या ओळखीच्या मनुष्यास ओळख द्यावयाची नसेल तर त्यानें आपल्या हातांतील पंख्यानें अगर हातरुमालानें आपलें तोंड झांकावें ह्मणजे झालें! तसें केलें ह्मणजे जणुं काय त्या माणसाची व आपली गांठच पडली नाहीं असें होऊन त्या दुसऱ्या मनुष्यास रागावण्यास अवसर रहात नाहीं! दुसरी एक मौजेची चाल अशी आहे कीं, जर सारख्याच योग्यतेचे दोन अधिकारी मेण्यांत बसून एकमेकांस ओलांडून जाण्याचा प्रसंग आला तर प्रत्येकजण आपल्या मेण्याच्या ज्या बाजूस दुसऱ्या अधिकाऱ्याचा मेणा असेल त्या बाजूचें दार तात्पुरतें बंद करून घेतो. परंतु जर वरीलसारखा प्रसंग एक लहान व दुसरा मोठा, अशा अधिकाऱ्यांच्या दरम्यान उद्भवला तर छोट्या अधिकाऱ्यास बड्या अधिकाऱ्याला सलामी देण्याकरितां मेण्यांतून खालीं उतरणें भाग पडतें. हा प्रसंग टाळण्याकरितां धूर्त असलेले लहान अधिकारी, बडा अधिकारी त्याच रस्त्यानें येत आहे असें समजतांच दुसऱ्या मार्गाकडे वळून त्याच्या दृष्टिआड होतात. बडा अधिकारी रस्त्यांतून फिरावयास निघाला ह्मणजे रस्ता मोकळा करण्याविषयीं जनतेस इषारा देण्याकरितां ढोल वाजवितात; आणि त्या ढोलावर पडणाऱ्या ठोक्यांवरून अधिकारी कोणत्या व किती श्रेष्ठ दर्जाचा आहे हें जाणतां येतें. कारण अमुक अधिकाऱ्यास अमुक ठोके वाजवावेत असा नियम ठरलेला असतो.

७. चिनी जनता सामान्यतः सौम्य स्वभावाची आहे. परंतु तिला जर कोणी विनाकारण त्रास दिला अगर चिडविलें तर मग मात्र ती वाघिणीसारखी चवताळते व दंगल उडवून देते. अशा वेळीं तिला आवरून धरण्याचें काम फार जोखमीचें व कष्टाचें असतें; व थोडाबहुत तरी रक्तपात झाल्यावांचून शांतता प्रस्थापित करितां येत नाहीं.

८. स्वतःचें घर–कुटुंब–यावर चिनी लोकांचें अत्यंत प्रेम असतें. यामुळें आपलें घरदार सोडून लांब जाण्यास ते फार कचरतात. त्यांनां नेहमीं आपल्या माणसांत–मुलाबाळांत–असावेंसें वाटतें. मृत्यु तर आपल्या घराहून अन्य ठिकाणीं येऊंच नये अशी त्यांची समजूत असते. घराबाहेर

अमलांत असून तेथील कुटुंबांची सामाजिक स्थिति आमच्याकडील अविभक्त कुटुंबांतील सामाजिक स्थितीप्रमाणेंच असते. बाप वारल्यावांचून मुलांनां विभक्त होतां येत नाहीं. एखादा मुलगा अगर कुटुंबांतील दुसरा कोणी पुरुष अगदीं वाईट चालीचा अगर व्यसनी निघाला तर त्याला कायमचा बहिष्कार घालण्यांत येतो व पुढें त्याची दुर्दशा होऊन त्यास फार वाईट स्थितींत मरण येतें. सुदैवानें या नियमाची अंमलबजावणी करण्याचे प्रसंग फारच थोड्या कुटुंबांवर येतात. चिनी लोकांत बहुभार्यत्वाची चाल आहे. परंतु पहिल्या बायकोलाच विशेष महत्व असतें. तिला जरी पोरबाळ झालें नाहीं तरी तिचें कुटुंबांतील महत्व कमी होत नाहीं. एकंदरीनें पाहतां चिनी लोकांची कौटुंबिक व्यवस्था त्यांनां फारच सुखकारक वाटते व जेव्हां एखादा पुरुष सरकारी नोकरीच्या निमित्तानें आपलें घर सोडून दूरच्या प्रांतांत जाण्यास निघतो तेव्हां त्याला मनापासून दुःख होत असतें.

९. चिनी लोक एकंदरींत फार कृतज्ञ आहेत; तसेच ते मोठे प्रेमळ व स्नेहाकरितां जिवास जीव देणारे आहेत. पण या सद्गुणांबरोबरच त्यांचे अंगीं खुनशीपणाचा दोषही असलेला आढळून येतो. ज्याला त्यांनीं एकदां आपला शत्रू मानलें त्याचा दीर्घद्वेष करण्यांत व त्याचा सूड उगविण्यांत त्यांची बरोबरी इतर कोणत्याही मानवसमाजास करतां येणार नाहीं! त्यांच्या ह्या मनोवृत्ति अत्यंत जाज्वल्य असतात.

१०. चिनी लोक अत्यंत उद्योगी आहेत; परंतु त्यांच्यापैकीं कांहीं लोकांस वेळाची फारशी किंमत वाटत नाहीं असें ह्मणतात. हे लोक जर कांहीं कामानिमित्त कोणास भेटावयास गेले तर काम आटोपलें तरी सुद्धां खुशाल रेंगाळत बसलेले असतात. मग त्या घरांतील माणसानें जेव्हां यांनां जाण्याचा इषारा करावा तेव्हां ते मोठ्या खेदानें तेथून हालतात.

११. चिनी वर्ष चांद्रमानाचें असतें; व दर २॥ वर्षांनीं त्यांत एक 'अधिक' महिना येत असतो. चिनी पंचांग सरकारी रीतीनें दरवर्षीं पेकींग येथें प्रसिद्ध होत असतें व त्यांत, शुभाशुभ दिवस, सणाचे व बादशहांच्या मृत्युतिथींचे दिवस ठळकपणें दर्शविलेले असतात. ह्या मृत्युतिथींचे दिवशीं सर्व सरकारी कचेऱ्या बंद असतात. या दिवशीं मोठमोठ्या अधिकाऱ्यांची

पिछाडीच्या दरवाजानें जाऊन घ्यावी लागते. ह्या दिवशीं पुढील दरवाजा बंद असतो व तो कोणत्याही सबबीवरून उघडला जात नाहीं.

१२. चिनी लोकांत शिष्टाचाराचें महात्म्य फार आहे. त्याविरुद्ध कोणी वर्तन केल्यास ते लोक तत्काल क्रुद्ध होतात. घरीं, दारीं, रस्त्यावर–सर्वत्र शिष्टाचारांच्या नियमांचें कोणाकडूनही उल्लंघन होतां कामा नये, अशी त्यांची दृढ समजूत असते. त्यांच्या शिष्टाचारांपैकीं मासल्याकरितां कांहीं थोडे पुढें सांगतों:—

रस्त्यांतून एखादा मनुष्य रिकामा चालला असतां मागून जर पाण्याची कावड घेऊन अगर अन्य ओझें घेऊन कोणी आला तर त्या रिकाम्या माणसानें तत्काल बाजूस होऊन त्या ओझें वहाणारास रस्ता मोकळा करून दिला पाहिजे. पायीं चालणारानें मेण्याच्या भारवाहकांस व त्यांनीं घोडेस्वारांस तसेंच या सर्वांनीं एखाद्या लग्नाच्या अगर अधिकाऱ्याच्या मिरवणुकीस रस्ता मोकळा करून द्यावा लागतो. तसेंच रस्त्यांत एखादा हमाल अगर फेरीवाला दमून मधेंच आपलें ओझें टाकून विश्रांति घेत बसला तर जाणारांयेणारांनीं त्याला त्रास न देतां त्यास वळसा घालून निघून जावें असा प्रघात आहे. त्याप्रमाणेंच चिनी रस्त्याच्या आजूबाजूला जागा सांपडेल तेथें जर कोणी व्यापाऱ्यानें तात्पुरतें दुकान मांडलें तर त्याच्या वाटेसही कोणी जातां कामा नये. परंतु, या नियमामुळें रस्त्यावर माणसांची दाटी होऊन गडबड व अव्यवस्था माजण्याचा संभव असतो. तथापि त्याचा त्या लोकांस फारसा विधिनिषेध नसतो. चिनी मनुष्यास कोणी भेटावयाला आला असतां त्यानें आपल्या जागेवरून उठून त्याचें स्वागत केलें पाहिजे व तो स्थानापन्न होईपर्यंत आपण आपल्या स्थानावर बसतां कामा नये. तसेंच तो परत जाईल तेव्हां त्याच्या मागें राहून–पुढें होतां कामा नये–दरवाजापर्यंत त्यास पोंचविलें पाहिजे. पाहुण्याला नेहमीं डाव्या अंगास बसण्याची जागा करावी लागते. कारण डावी बाजू ही विशेष मानाची समजली जाते. या भेटींत स्त्रियांच्या नांवाचा नुसता उल्लेख सुद्धां कोणी करतां कामा नये. भेटीस येणारा पाहुणा स्थानापन्न होतांच त्याला एक पेलाभर चहा अर्पण करावयाचा असतो. त्यांत बिलकूल चूक होतां कामा नये. तो पेला देणारानें दोन्ही हातांनीं दिला पाहिजे व घेणारानेंही दोन्ही हातांनीं घेतला पाहिजे. एका

हातानें देणें–घेणें असभ्यतेचें लक्षण मानलें गेलें आहे. हा चहा पिण्याचें काम मात्र मुलाखत पुरी झाल्यावर होत असतें. जर एखादे वेळीं ही मुलाखत लवकर संपावी असें घरधन्यास वाटेल तर तो आपण होऊन चहाचा पेला हातीं घेऊन आपल्या पाहुण्यासही तो पिण्याचा इषारा करितो. तो इषारा मिळतांच पाहुण्यास त्या घरधन्याबरोबर चहा पिणें भाग पडतें आणि हें चहा-पान आटोपतांच त्या बिचाऱ्यास निघून जाण्याची तयारी करावी लागते. ह्या मुलाखतीच्या वेळीं जर कोणी चष्मा लावलेला असला तर तो काढून घ्यावा लागतो. अलीकडे हा नियम मात्र शिथिल होत चालला आहे.

१३. जर कोणास प्रामाणिकपणें वागून दारिद्र्य प्राप्त झालें असेल अगर मुळचेंच असेल तर त्याचा चिनी समाजांत कधींही अवमान होत नाहीं. संपत्तीपेक्षां शीलाचें महत्व ह्या समाजांत विशेष मानलें जातें. तसेंच विद्या-संपन्न पुरुषांचाही ह्या समाजांत फार गौरव होतो.

१४. चिनी लोक लिहिलेल्या अगर छापलेल्या कागदास ‘ पवित्र ’ कागद समजतात. असले कागद पायाखालीं तुडविणें, रस्त्यांत फेंकणें, अगर त्यांचे पुस्तकाला पुठ्ठे घालणें त्यांना आवडत नाहीं. ते कागद निरुपयोगी ठरल्यास त्यांचे तुकडे करून ते पेटलेल्या अग्नींत टाकणें मात्र त्यांना मान्य आहे. कारण अग्नि हा पवित्र असल्यामुळें त्याच्या साह्यानें ते कागद पवित्र ठिकाणीं जाऊन पोंचतात अशी त्यांची समजूत असते. याकरितां चिनी रस्त्यावर कागद जाळण्याकरितां ठिकठिकाणीं सुरक्षित जागा व भट्ट्या केलेल्या असतात. बूट किंवा जोडे यांच्या कामीं असल्या कागदांचा उपयोग करणें हें गुन्हा मानलेलें आहे.

१५. चिनी लोकांचा पुनर्जन्मावर पूर्ण विश्वास असतो. व सामान्यतः हे लोक बरेच धर्मभोळेही असतात.

# उपसंहार.

हा वेळपर्यंत चिनी लोकांसंबंधानें जी विविध प्रकारची माहिती थोडक्यांत सांगितली त्यावरून स्थूलमानानें त्यांच्या संस्कृतीविषयीं व राष्ट्रीय स्वभावाविषयीं वाचकांनां बरीच स्पष्ट कल्पना करतां येण्यासारखी आहे. एकंदरींत हे लोक जर आधुनिक शास्त्रें व कला यांचें ज्ञान संपादन करून घेतील तर लवकरच जपानपेक्षांही बलाढ्य असें राष्ट्रीय सामर्थ्य आशिया खंडांत उत्पन्न करूं शकतील, असें मानण्यास कांहीं प्रत्यवाय दिसत नाहीं. नेकी, देशाभिमान, उद्योगशीलता, साधेपणा, काटकपणा, चिकाटी वगैरे राष्ट्रोत्कर्षास अवश्यक असणारे सद्गुण चिनी लोकांत मुळचेच असून त्यांचें तत्वज्ञानही श्रेष्ठ दर्जाचें आहे. याखेरीज धर्म व जात या दृष्टीनेंही त्या राष्ट्रांत बरीच एकरूपता आहे. लोकसंख्येच्या दृष्टीनें पाहिलें तर तें सर्व जगास भारी आहे. तथापि त्याची स्थिति कांहीं अंशीं कुंभकर्णाप्रमाणें आहे. कुंभकर्ण हा कांहीं कमी सामर्थ्यवान् नव्हता. पण बिचारा एकदां झोंपी गेला ह्मणजे फिरून लवकर जागा होईल तर शपथ! असली आसुरी झोंप घेण्याची संवय चिनी राष्ट्रास लागलेली आहे व हा त्याच्या फाजील सहनशीलतेचा परिणाम आहे. परंतु असें जरी असलें तरी त्याची दीर्घकालीक निद्रा ही कांहीं **महानिद्रा** मात्र खास नव्हे, असें मागें दिलेल्या हकीगतीवरून कोणाच्याही सहज लक्षांत येण्यासारखें आहे. चिनी राष्ट्रानें आजपर्यंत कैक वेळां अशा लांब झोंपा काढलेल्या आहेत. परंतु त्या झोंपांतून जागें झाल्यानंतर तें आपलें तेज प्रगट केल्यावांचून कधींही राहिलेलें नाहीं. दीर्घ कालानें कां होईना, पण जुलूम व अन्याय आणि अव्यवस्था यांचा बींमोड त्या राष्ट्रानें आजपर्यंत अनेक वेळ केलेला आहे. आणि पाहिजे त्या परिस्थितीला अनुसरून वागण्याची धमक त्याच्यामध्यें असल्यामुळें यापुढेंही जगांत स्वतंत्र राष्ट्र या नात्यानें तें आपलें योग्य स्थान कायम ठेवील याबद्दल कोणाही इतिहासज्ञास संशय वाटत नाहीं. मात्र ही स्थिति प्राप्त करून घेण्यास त्यास बराच काल लागेल हें उघड आहे. जपानचें चापल्य व संघटनासामर्थ्य ह्या राष्ट्राचे अंगीं नाहीं व तें येणें फारसें

शक्यही नाहीं. कारण जपानपेक्षां येथील लोकसंख्या फार मोठी असून त्या मानानें शिक्षणाचा प्रसारही कमी आहे. शिवाय जपानला इंग्लंडप्रमाणेंच निर्वाहाकरितां जसें इतर राष्ट्रांतील पैदासीवर अवलंबून रहावें लागतें तसें चीनला अवलंबून रहावें लागत नसल्यामुळें जपानपेक्षां चीनमध्यें स्वभावतःच थोडेंसें शैथिल्य उत्पन्न होणें साहजिक आहे. बाकी, देशाभिमानाच्या बाबतींत चिनी राष्ट्र कांहीं जपानच्या मागें नाहीं. मात्र वरील परिस्थितीमुळें त्यांचा देशाभिमान प्रज्वलित होऊन कार्यक्षम होण्यास थोडासा उशीर लागतो इतकेंच.

मागील वृत्तांतावरून दुसरी एक गोष्ट जी ध्यानांत येण्यासारखी आहे ती ही कीं, चिनी लोकांनां, लोकमतानुसार राज्यकारभार चालवून घेण्याची संवय व माहिती आहे. आजपर्यंतची त्यांची राज्यव्यवस्था दिसण्यांत जरी एकतंत्री असली तरी व्यवहारतः तिचा अंमल लोकमतानुसारच होत आल्याचें दिसून येतें. जेथें जेथें आणि जेव्हां जेव्हां ही एकतंत्री राजसत्ता लोकमतास प्रतिकूल झाली तेथें व तेव्हां लोकपक्षानें तिच्याशीं दोन हात करून आपलेंच वर्चस्व एकंदरीनें प्रस्थापित केल्याचें स्पष्ट दिसून येत आहे. लोकमताचें वजन व भीति यांची छाया चिनी अधिकाऱ्यांच्या मागें सतत असते व तिला ते मनांतल्या मनांत तरी नमून असतात हें मागें दिलेल्या हकीगतींतील अनेक प्रसंगांवरून लक्षांत येण्याजोगें आहे. अशी ज्या लोकांची परंपरा त्यांनां आधुनिक कालांतील लोकसत्ताक राज्यपद्धति चालवितां येणें कांहीं फारसें कठीण नाहीं. चिनी राष्ट्राच्या अंगीं जर हे जीवंतपणाचे गुण नसते तर यापूर्वींच तें परराष्ट्रांच्या भक्ष्यस्थानीं पडलें असतें. चिनी देशांत सांप्रत अंतस्थ कलह माजल्याचीं जीं लक्षणें दिसत आहेत तीं कांहीं त्या राष्ट्राच्या नाशाचीं चिन्हें नव्हत. तीं त्यांच्यांतील तीव्र जागृतीचीं लक्षणें आहेत. अशा प्रकारच्या राष्ट्रीय जागृतीच्या वेळीं एवढ्या मोठ्या अफाट लोकसंख्येच्या देशांत मतभेद व पक्षाभिमान उत्पन्न होणें अपरिहार्य आहे. त्यांतून ही जागृती ज्या कारणांमुळें उत्पन्न झाली आहे त्यांचा विचार केला तर वरील स्थितीबद्दल मुळींच आश्चर्य वाटणार नाहीं. चीनदेश गेल्या शतकाच्या अर्ध्या अधिक कालापर्यंत युरोपखंडाच्या संसर्गापासून अगदीं अलिप्त होता. परंतु पुढें पाश्चात्य राष्ट्रांनीं जेव्हां तेथें चंचु-प्रवेश केला तेव्हांपासून एक नवीन संस्कृति व नवीन विचार यांचा त्या देशांत प्रादुर्भाव होऊं लागला. चिनी

संस्कृतीहून ही संस्कृति अगदीं भिन्न असल्यामुळें व कित्येक बाबतींत तर ती चिनी लोकांस विपरीत वाटणारी असल्यामुळें ह्या दोन संस्कृतींच्या प्रवर्तकांत अर्थातच रणें माजूं लागलीं. पाश्चात्य संस्कृतींतील कांहीं व्यवहार्य व उपयुक्त भागाचें तरूण चिनी लोकांनीं अवलंबन केल्यामुळें तर एकंदर राष्ट्रांत बरीच खळबळ उडून गेली आणि जुन्या व नव्या पंथांच्या लोकांत वाद माजून त्यांत अनेक पक्ष व उपपक्ष निर्माण झाले. आवेशाच्या भरांत हे पक्ष जरी आपापसांत भांडले तरी चिनी राष्ट्राचें कल्याण करण्याची बुद्धि सामान्यतः सर्वांच्या ठायीं सारखीच असल्यामुळें त्या भांडणांचा चिनी राष्ट्राच्या स्थितीवर कोणताही कायमचा अनिष्ट परिणाम घडून येणें शक्य नाहीं. उदाहरणार्थ डॉ० **सन्यत्सेन** व **युआनशिकाई** यांच्या कृत्यांचाच आपण थोडासा विचार करूं. हे दोन थोर पुरुष अनुक्रमें चीनमधील राष्ट्रीय व नेमस्त अथवा तरूण व जुन्या पिढीचे पुढारी आहेत. उभयतांमध्यें व त्यांच्या अनुयायांमध्यें इतका तीव्र मतभेद आहे कीं, राष्ट्रहिताकरितां परस्परांनां परस्परांचीं डोकीं उडवावींशीं वाटतात! परंतु दुर्दैवानें ह्यांपैकीं कोणताही एक पक्ष जरी अंतःकलहाला बळी पडला तरी **राष्ट्रीयदृष्ट्या** चीनचें अकल्याण होण्याचा लेशमात्रही संभव नाहीं. जो पक्ष प्रबल होऊन टिकेल तो आपल्या कल्पनेप्रमाणें किती जरी वागला तरी लोकमतास मान देऊन त्याला चीनचा राष्ट्रीय दर्जा वाढविणें भागच आहे. आणि चीनमधील अंतःकलहाचें जो कोणी सूक्ष्म निरीक्षण करील त्यास असें स्पष्ट आढळून येईल कीं, हा सर्व कलह केवळ चीनचा राष्ट्रीय दर्जा वाढविण्याच्याच हेतूनें उपस्थित होऊन त्या अनुरोधानेंच मुख्यतः चाललेला आहे. येथें अर्थातच तेथील बारीक सारीक बंडाळीचा अगर लोकक्षोभाचा विचार केलेला नाहीं व अशा प्रकारच्या स्थूल विवेचनांत त्यांचा विचार करण्याचें कांहीं प्रयोजनही नाहीं. येथें फक्त मुख्य मुख्य व ढोबळ गोष्टींचाच विचार कर्तव्य आहे.

आणि त्यांचा विचार केला असतां आह्मास तर असें खास वाटतें कीं, **युआनशिकायी** व डा० **सन्यत्सेन** यांच्यामध्यें कितीही जरी तीव्र मतभेद असला तरी त्यामुळें चिनी राष्ट्रकार्याची हानी होण्याचा बिलकूल संभव नाहीं. या अंतःकलहामुळें व परराष्ट्रांच्या कैचीमुळें प्रस्तुत, **युआनशिकाईचा** मार्ग जरी कंटकमय झाला असला आणि त्याकरितां जरी कांहीं काल तेथील

राजसत्तेचें केंद्रीकरण करण्याची त्यास आवश्यकता भासली असली तरी हे सर्व प्रसंग केवळ अगांतुक असून आळवावरच्या पाण्याप्रमाणें अगर ग्रीष्म ऋतूंतील गडगडणाऱ्या मेघाप्रमाणें होत. त्यांमुळें चिनी लोकसत्ताक राज्याला धक्का पोंचण्याचा अगर तें नष्ट होण्याचा तिलमात्र संभव नाहीं. चिनी लोकांमध्यें व्यक्तिस्वातंत्र्य व समता यांचें फार प्राचीनकालापासून वास्तव्य असल्यामुळें राष्ट्रीय उदयाच्या त्यांच्या भावना अगदीं स्पष्ट असून त्या सर्वांच्या अंगीं सारख्या मुरलेल्या आहेत. ऐक्यसंवर्धनाची कला तर त्यांनां फारच चांगली अवगत आहे. जेव्हां जेव्हां त्यांच्या देशांत संप अगर बहिष्कार यांची चळवळ सुरु असते तेव्हां त्यांचें हें ऐक्यसंवर्धनाचें सामर्थ्य चांगलें दृष्टीस पडतें.

आज सुमारें २२ शें वर्षेपर्यंत जें राष्ट्र वरील गुणांच्या जोरावर टिकाव धरून राहिलें आहे तें त्याच गुणांवर श्रेष्ठत्व संपादन करणाऱ्या इतर राष्ट्रांनां यापुढें हार जाईल अथवा त्यांच्या मागें राहील असें अनुमान काढणें चुकीचें-धोक्याचें-होईल. गतशतकांत त्याला जी झोंप लागली होती तींतून तें चालू शतकाच्या प्रारंभीं जागें होऊन कामास लागलें आहे; आणि जोंपर्यंत तें ह्या जागृतावस्थेंत आहे तोंपर्यंत त्याची पिछेहाट होण्याची मुळींच भीति नाहीं. उलट नवीन परिस्थितीस व कालास अनुसरून तें पुन्हां एकदां राजकीयदृष्ट्या जगांतील इतर बलाढ्य राष्ट्रांच्या पंक्तीस जाऊन बसेल यांत शंका नाहीं. आमच्या ह्या मताच्या पुष्टिकरणार्थ चीन देशांतील स्थित्यंतरांचा विचारपूर्वक अभ्यास करणाऱ्या एका इंग्रज ग्रंथकाराचा एतत् प्रकरणीं असलेला अभिप्राय नमूद करून आह्मीं या विषयाची रजा घेतों. सदर ग्रंथकार ह्मणतो:—

" The spirit of personal freedom seems to breathe through all Chinese institutions, and to unite the people in resistance to every form of oppression. The Chinese have always believed in the divine right of kings; on the other hand, their kings must bear themselvs as kings, and live up to their responsibilities as well as to the rights they claim. Otherwise, the obligation is at an end, and their snbjects

will have none of them. * * * * China has always been at the highest rung of the democratic ladder; * * * * Those who know the Chinese at home know that when they offer political advice they mean it to be taken. The great democracy of China, living in the greatest republic the world has ever seen, would never tolerate any paltering with national liberties in the present or in the future, any more than has been the case in the past. Those who sit in the seats of authority at the capital are far too well acquainted with the temper of their countrymen to believe for a moment that, where such vital interests are concerned, there can be anything contemplated save steady and satisfactory progress towards the goal proposed."

Mr. Giles on the Civ. of China.

---

समाप्त.